
पश्चिम विदर्भातील सर्वाधिक खपाचे अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला अमरावती ■ वर्ष १५ ■ अंक १८७ ■ मंगळवार, दि.१३ जानेवारी २०२६ ■ मुल्य ३ रुपये ■ पृष्ठे ६

RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642 ■ Postal Regn. No. AKL DN /283 / 2024-2026 http://epaper.citynewssuperfast.com







C M Y K

पश्चिम विदर्भातील सर्वाधिक खपाचे अग्रगण्य सायं दैनिक
सिटी न्यूज सुपरफास्ट
अकोला अमरावती
वर्ष १५ ■ अंक १८७ ■ मंगळवार, दि.१३ जानेवारी २०२६ ■ मुल्य ३ रुपये ■ पृष्ठे ६
RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642 ■ Postal Regn. No. AKL DN /283 / 2024-2026 http://epaper.citynewssuperfast.com




# आज प्रचारतोफ थंडावणार !

## 630 मतदान केंद्रांवर होणार मतदान
## सीसीटीव्ही, वेबकास्टिंग, झोनल अधिकाऱ्यांचा राहणार वॉच
## संवेदनशील, अतिसंवेदनशील मतदान केंद्रांवर विशेष लक्ष

प्रतिनिधी १३जानेवारी

**अकोला :** अकोला महानगरपालिकेच्या निवडणुकीचा प्रचार आज थांबणार असून, गुप्त बैठका व प्रत्यक्ष भेटीवर उमेदवारांचा भर राहणार आहे. हे शेवटचे दोन दिवस उमेदवारांसाठी 'टर्निंग पाइंट' असल्यामुळे सर्वच जण कामाला लागले आहेत तर दुसरीकडे प्रशासनानेही आपली जय्यत तयारी केली आहे.

जेणेकरून लोकशाहीच्या या उत्सवाला गालबोट लागणार नाही. या पार्श्वभूमीवर सर्वत्र कडेकोट व्यवस्था केली आहे. शहरातील ६३० मतदान केंद्रांवर महापालिका निवडणूक होणार आहे. तसेच शहरातील संवेदनशील व अतिसंवेदनशील केंद्रांची स्वतंत्र यादी तयार केली असून, त्यावर विशेष लक्ष राहणार आहे. या व्यतिरिक्त सीसीटीव्ही, वेबकास्टिंगसह झोनल अधिकाऱ्यांचाही वॉच असणार आहे. सार्वत्रिक निवडणुकीसाठी प्रशासनाने कंबर कसली असून, शहर व हद्दवाढ क्षेत्रात एकूण ६३० मतदान केंद्रांवर मतदान प्रक्रिया पार पडणार आहे. मतदारांना निर्भय, सुरक्षित आणि सुरळीत मतदान करता यावे, यासाठी जिल्हा प्रशासन, मनपा प्रशासन, पोलीस यंत्रणा आणि निवडणूक विभाग एकत्रितपणे काम करत असल्याचे चित्र आहे. महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रत्येक मतदान केंद्रावर आवश्यक भौतिक सुविधा, मतदान साहित्य, कर्मचारी नियुक्ती आणि सुरक्षा व्यवस्था पूर्ण करण्यात आली आहे. ईव्हीएम व व्हीव्हीपॅट मशिन्सची तपासणी, सीलिंग आणि वितरण प्रक्रिया नियोजनबद्धरीत्या पार पाडली जात असून, कोणतीही त्रुटी राहू नये, यासाठी विशेष दक्षता घेण्यात आली आहे. प्रत्येक मतदान केंद्रावर प्रशिक्षित मतदान अधिकारी व कर्मचारी तैनात करण्यात येणार आहेत. अकोल्यातील मतदारांनी मोठ्या संख्येने मतदान करून लोकशाही बळकट करावी, असे आवाहन निवडणूक व मनपा प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

### तक्रारीसाठी २४ तास नियंत्रण कक्ष

ज्येष्ठ नागरिक, दिव्याग मतदार आणि महिलांसाठी स्वतंत्र सोयी, रॅम्प, पिण्याचे पाणी, स्वच्छतागृहे आदी सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. मतदारांची गैरसोय होऊ नये म्हणून मतदान केंद्रांची स्पष्ट माहिती, फलक आणि मदत कक्ष उभारले जाणार आहेत, कोणत्याही अफवा, गैरप्रकार किंवा अनुचित प्रकारांना थारा दिला जाणार नसून तक्रारींसाठी नियंत्रण कक्ष २४ तास कार्यरत ठेवण्यात येणार आहे.

### संवेदनशील केंद्रांवर अतिरिक्त पोलिस कुमक

कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीने प्रशासनाने कठोर उपाययोजना केल्या आहेत. संवेदनशील व अतिसंवेदनशील मतदान केंद्रांची स्वतंत्र यादी तयार करून तेथे अतिरिक्त पोलीस बंदोबस्त, होमगार्ड, तसेच फिरते पथक तैनात करण्यात येणार आहे. तसेच सीसीटीव्ही कॅमेरे, वेबकास्टिंग, झोनल अधिकारी आणि निरीक्षक यांच्यामार्फत सतत लक्ष ठेवले जाणार आहे. आदर्श आचारसंहितेचे काटेकोर पालन व्हावे यासाठी भरारी पथके व स्थिर पथके सक्रिय करण्यात आली आहेत.

### सर्वात मोठा प्रभाग १८

अकोला महापालिका निवडणुकीत २० प्रभाग असून, यात सर्वात मोठा प्रभाग क्र. १८ असून, या प्रभागात प्रमुख राजकीय पक्षांसोबतच अपक्ष मिळून ३१ उमेदवार रिंगणात आहेत. सर्वात लहान प्रभाग क्र. ६ असून या प्रभागात १७ उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत. विशेष म्हणजे या ठिकाणी वंचितचा एकही उमेदवार नसून, काँग्रेसचा केवळ एकच उमेदवार आहे.

### प्रचार थांबल्यानंतर सोशल माध्यमांवरही प्रचारास मनाई

यंदा निवडणूक आचारसंहितेचे नियमात बदल केला असून, प्रत्यक्ष प्रचारतोफा थंडावल्यानंतर कोणत्याच प्रकारे प्रचार करण्यास मनाई केली आहे. यामध्ये सोशल मीडिया, वृत्तपत्र, इलेक्ट्रॉनिक मीडिया किंवा इतर तत्सम साधनाद्वारे उमेदवारांचा प्रचार करता येणार नाही, हे विशेष.




### 'लाडकी बहीण' चमत्कार घडवू शकते!

अकोला महानगरपालिका निवडणुकीत पुरूषांपेक्षा महिला मतदारांची संख्या अधिक असल्याने लाडकी बहीण चमत्कार घडवू शकते. २० प्रभागात ८०जागांसाठी ४६९ उमेदवार उभे आहेत. या उमेदवारांना मतदान करण्यासाठी ५ लाख ५० हजार ६० आपला हक्क बजावणार आहेत. यात पुरूष मतदार २ लाख ७४ हजार ८७७ तर महिला मतदार २ लाख ७५ हजार १४२ एवढी आहे. तसेच इतर मतदार ४१ आहेत.

### अशी आहे मतदानाची सज्जता

आदर्श आचारसंहितेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी ७ फिरते पथक, २२ स्थिर सर्वेक्षण पथक, ४ व्हिडीओ सर्व्हेलन्स पथक व २४ तास कार्यरत असलेले तक्रार निवारण केंद्र सुरू करण्यात आले आहे. तसेच दिव्यांग व ज्येष्ठ नागरिकांसाठी २१३ मतदान केंद्रांवर व्हीलचेअरची सुविधा, मुस्ली महिला मतदारांसाठी पडदा नशीन पद्धतीसाठी स्वतंत्र महिला कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. मतदान पथकांसाठी ८३ मोठी व १३८ लहान वाहने उपलब्ध आहेत.

# अकोलेकरांनी भयमुक्त वातावरणात मतदान करावे
## निवडणुकीची तयारी पुर्ण – आयुक्त डॉ. सुनील लहाने

प्रतिनिधी १३जानेवारी

**अकोला:** अकोला महापालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी महापालिका प्रशासनाची तयारी पुर्ण झाली आहे. अशी माहिती महापालिका आयुक्त तथा निवडणुक निर्णय अधिकारी डॉ.सुनील लहाने यांनी आज येथे पत्रकार परिषदेत दिली. मतदारांनी भयमुक्त वातावरणात मतदान करण्याचे आवाहन आयुक्त लहाने यांनी अकोलेकरांना केले आहे.

अकोला महानगरपालिका आयुक्त तसेच निवडणूक अधिकारी सुनील लहाने यांच्या मार्गदर्शनाखाली १४ जानेवारीला मतदान करिता लागणारे ईव्हीएम मशीन, बॅलेट युनिट सिलिंग व पोस्टर बॅलेट आदी साहित्याचा कर्मचारी यांना वाटप करण्यात येणार आहे.



६३० मतदान केंन्द्रा करिता मतदान संपन्न करणारी टिम शहरातील सहा ठिकाणी ज्यामध्ये अकोला जिल्हा मराठा मंडळ रामदास पेठ, शासकीय धान्य गोडाऊन जिल्हाधिकारी कार्यालय परिसर, निमवाडी पोलीस वसाहत येथील मल्टीपर्पज हॉल, राजमाता जिजाऊ अभियंता प्रशिक्षण केंद्र रेल्वे स्टेशन जवळ, जिल्हा परिषद कर्मचारी कल्याण भवन सिव्हिल लाईन जवळ तसेच शासकीय धान्य गोडाऊन खदान मंगरूळपीर रोड येथून साही झोनचे सर्व निवडणूक निर्णय अधिकारी व सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या मार्गदर्शना खाली ६३० मतदान केंद्रा करिता रवाना होतील. अकोला महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने आयुक्त डॉ.सुनिल लहाने यांच्या व्दारे आज दि. १२ जानेवारी २०२६ रोजी अकोला महानगरपालिकेच्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर मुख्य सभागृह येथे दुपारी ३.०० वा. पत्रकार परिषद संपन्न झाली. यावेळी मनपा सहा.आयुक्त सुमेध अलोने, मनपा उपायुक्त विजय पारतवार, निवडणूक विभाग प्रमुख अनिल बिडवे, जनसंपर्क अधिकारी भरत शर्मा आदींची उपस्थिती होती.

## एमआयएमतर्फे जितेश रामचंद्र बरेठिया यांची स्वीकृत सदस्य म्हणून निवड

प्रतिनिधी १३जानेवारी

**अकोट:** अकोट नगर परिषदेत राजकीय घडामोडी अतिशय वेगाने होत आहे. एम आय एम तर्फे जाते रामचंद्र बरेठिया यांची स्वीकृत सदस्य म्हणून निवड करण्यात आली.

अकोट विकास मंच तर्फे स्वीकृत सदस्य म्हणून मंगेश लोणकर व संतोष झुनझुनवाला यांची नियुक्ती करण्यात आली आहे. तर राष्ट्रीय काँग्रेस पार्टी तर्फे सारंग मालानी यांची स्वीकृत सदस्यपदी निवड करण्यात आली आहे. अकोट नगर परिषद राजकीय घडामोडीचे हॉट सेंटर ठरले आहे.

## निवडणुकीला गालबोट : 'आप'च्या उमेदवारावर रोखली बंदूक!

**नाशिक :** नाशिक महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय वातावरण तापले असतानाच, प्रभाग क्रमांक ११ मध्ये घडलेल्या धक्कादायक घटनेमुळे एकच खळबळ उडाली आहे. नाशिकच्या सातपूर परिसरात आम आदमी पक्षाचे उमेदवार समाधान आहेर यांच्यावर प्रचारादरम्यान थेट बंदूक ताणून धमकी देण्यात आल्याची गंभीर घटना घडली आहे.मिळालेल्या

# जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुका आज जाहीर होणार?

प्रतिनिधी १३जानेवारी

**मंबई :** जिल्हा परिषदा आणि पंचायत समिती यांच्या निवडणुकांची घोषणा ही आज होणार आहे. १२ जिल्हा परिषदा आणि १२५ पंचायत समिती यांच्या निवडणुकांची घोषणा आज केली जाईल.

## आयोगाची आज पत्रकार परिषद

निवडणूक आयोगाची पत्रकार परिषद आज दुपारी होणार आहे, या पत्रकार परिषदेमध्ये या निवडणुकीची घोषणा होईल. ५० टक्क्यांच्या वर आरक्षण गेलेल्या जिल्हा परिषदांची निवडणूक ही दुसऱ्या टप्प्यांमध्ये घेतली जाणार आहे त्यामुळे सर्वोच्च न्यायालयाने मोठा दिलासा दिलेला आहे. याबाबत १५ दिवसांची मुदतवाढ देखील देण्यात आली आहे. त्यामुळे येत्या १५ फेब्रुवारीपर्यंत जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुका होणार आहेत. नेमक्या कधी या निवडणुका होतील, याची तारीख आज जाहीर केली जाईल. आज दुपारी चार वाजता ही पत्रकार परिषद पार पडणार आहे.



पुणे, सोलापूरसह राज्यातील १२ जिल्हा परिषद निवडणुकींचे बिगुल वाजणार आहेत. आयोगाने निवडणुकीची घोषणा करताच १२ जिल्हा परिषदेत आचारसंहिता लागू होणार आहे. राज्यातील जिल्हा परिषद आणि पंचायत समितींच्या निवडणुकांबाबत महत्त्वाचा निर्णय सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे. या निवडणुका घेण्यासाठी अधिक वेळ देण्यात यावा, अशी विनंती राज्य निवडणूक आयोगाने सर्वोच्च न्यायालयाकडे केली होती. त्यानुसार आयोगाने १० फेब्रुवारीपर्यंत मुदतवाढ देण्याची मागणी केली होती.यापूर्वी सर्वोच्च न्यायालयाने महाराष्ट्र राज्य निवडणूक आयोगाला ३१ जानेवारी २०२६ पर्यंत निवडणुका घेण्याचे निर्देश दिले होते. मात्र, राज्यातील आरक्षणाच्या स्थितीमुळे निवडणूक प्रक्रियेत अडचणी निर्माण झाल्या आहेत.

### पहिल्या टप्प्यात अकोला जिल्हा परिषद नाही?

लातूर, छत्रपती संभाजीनगर, परभणी, धाराशिव, सोलापूर, कोल्हापूर, पुणे, सातारा, सांगली, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग या १२ जिल्हा परिषदा आणि त्या अंतर्गत येणाऱ्या १२५ पंचायत समित्यांच्या निवडणुकीची आज घोषणा होणार आहे. १२ जिल्हा परिषदेचे आरक्षण ५० टक्क्यांच्या आत आहे, त्यामुळे निवडणुका घेण्यात येणार आहेत.

### आरक्षणावर २१ जानेवारी रोजी सुनावणी

ओबीसी आरक्षणासंदर्भात आणि बांठिया आयोगाच्या अहवालाच्या वैधतेबाबत २१ जानेवारी २०२६ रोजी सर्वोच्च न्यायालयात ऐतिहासिक सुनावणी होणार आहे. या सुनावणीत आरक्षणाची ५० टक्क्यांची मर्यादा आणि सभापती पदांचे आरक्षण यावर अंतिम निर्णय घेतला जाईल.

## राज्यातील 'बिनविरोध' निवडीला स्थगिती मिळणार?

प्रतिनिधी १३जानेवारी

**मुंबई :** राज्यात २९ महापालिका निवडणुका सुरू आहेत. त्यात सत्ताधारी आणि विरोधक आमनेसामने आले आहेत. मात्र या निवडणुकांच्या मतदानापूर्वी राज्यात ६० हून अधिक ठिकाणी बिनविरोध उमेदवार निवडून आलेत. विशेष म्हणजे हे उमेदवार सत्ताधारी महायुतीचे आहेत. त्यात सर्वाधिक बिनविरोध भाजपाचे आणि त्याखालोखाल एकनाथ शिंदेंच्या पक्षाचे आहेत. निवडणुकीतील या बिनविरोध पॅटर्नविरोधात मनसे नेते अविनाश जाधव यांनी कोर्टात धाव घेतली होती. उमेदवारांना पैशाची आमिषे, दहशत याचा वापर करून सत्ताधाऱ्यांनी निवडणूक बिनविरोध करण्याचा प्रयत्न केला असा मनसेचा आरोप आहे.

# अकोल्यात रणकंदन !
## महिलांनी भररस्त्यात पेटवल्या साड्या !

प्रतिनिधी १३जानेवारी

**अकोला:** निवडणूक जवळ येताच मतदारांना आपल्याकडे वळवण्यासाठी उमेदवारांकडून नवनवीन क्लुप्त्या लढवल्या जात आहेत. मात्र, अकोल्यात आज स्वाभिमानी महिलांनी उमेदवाराचा 'साडीचा डाव' अक्षरशः धुळीस मिळवला आहे. अकोला महापालिकेच्या प्रभाग ४ मधील ताथोड नगर परिसरात उमेदवाराने मतदारांना साड्या वाटल्या, पण इथल्या रणरागिणींनी या साड्या स्वीकारण्याऐवजी त्या चक्क पेटवून दिल्या आहेत!



ताथोड नगर परिसरात रात्रीच्या सुमारास किंवा पहाटे एका अज्ञात उमेदवाराच्या कार्यकर्त्यांनी अनेकांच्या घरासमोर साड्या नेऊन ठेवल्या होत्या. सकाळी जेव्हा महिलांनी हे पाहिले, तेव्हा परिसरात एकच खळबळ उडाली. 'मत विकत घेण्यासाठी साड्यांचे आमिष दाखवले जात आहे' हे लक्षात येताच महिलांचा संताप अनावर झाला.संतापलेल्या महिलांनी केवळ साड्या नाकारल्याच नाहीत, तर त्या साड्यांची गुणवत्ता पाहून उमेदवाराची चांगलीच कानउघाडणी केली.वाटलेल्या साड्यांची क्वालिटी अत्यंत बोगस आणि हलक्या दर्जाची आहे.उमेदवाराने महिलांचा अपमान केल्याची भावना व्यक्त करत, जमलेल्या महिलांनी त्या साड्या भररस्त्यात फाडल्या आणि नंतर त्यांची होळी केली. या प्रकारानंतर संपूर्ण अकोला जिल्ह्यात मोठी खळबळ उडाली आहे. प्रभाग ४ मध्ये अशा प्रकारे साड्यांचे वाटप करणारा तो 'अदृश्य' उमेदवार नेमका कोण?

# कुठे प्रतिष्ठा पणाला तर कुठे अस्तित्वाची लढाई

प्रतिनिधी १३जानेवारी

**अकोला :** आज मनपा निवडणुकीचा प्रचाराचा अखेरचा दिवस असल्याने सर्वच पक्षाच्या उमेदवारांनी प्रचारासाठी कंबर कसली असून, आपली प्रतिष्ठा पणाला लावली आहे. तर काहींसाठी ही निवडणूक आपले अस्तित्व सिद्ध करण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरत आहे. त्यामुळे सर्वच पक्षांचे वरिष्ठ आपल्या पक्षाच्या उमेदवाराच्या प्रचारासाठी जीवाचे रान करताना दिसून येत आहेत.

अकोला महानगरपालिकेची निवडणूक भाजपासाठी प्रतिष्ठेची बनली असून, त्यांनी सुरूवातीपासूनच प्रचारात आघाडी घेतली आहे. अकोल्यात भाजपा व राष्ट्रवादी अजित पवार यांची युती असून, आतापर्यंत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, महसूल मंत्री चंद्रशेख बावनकुळे, पालकमंत्री आकाश फुंडकर आदींच्या प्रचार सभा झाल्या आहेत. त्याशिवाय खा. अनुप धोत्रे, आ. रणधीर सावरकर सुरूवातीपासूनच प्रचारात असून, त्यांनी प्रत्येक वॉर्ड अक्षरश: पिंजून काढले आहेत. याशिवाय शिंदे सेनेची एकच सभा पार पडली असून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उमेदवारांसह मतदारांमध्ये ऊर्जा निर्माण करण्याचे कार्य केले. काँग्रेस व वंचितची अस्तित्व टिकविण्यासाठी लढाई सुरू असून, त्यांनी प्रचारात माघार घेतल्याचे दिसून येते.राष्ट्रवादी काँग्रेसचे महानगराध्यक्ष विजय देशमुख यांनी राष्ट्रवादी आणि भाजपाच्या उमेदवारांचा जोरकस प्रचार केला. याचे यश निवडणूक निकालात दिसेल.तर आ. साजिद खान पठाण एकहाती किल्ला लढवित पक्षाचे अस्तित्व टिकविण्यासाठी जीवतोड परिश्रम घेत असल्याचे दिसून येत आहे. त्यांच्या प्रयत्नांना मतदार कितपत साथ देतात हे येणार काळच सांगणार आहे. तर दुसरीकडे वंचितने अखेरच्या टप्प्यात का होईना ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी एक सभा घेऊन मतदारांमध्ये प्राण फुंकण्याचे काम केले. तत्पूर्वी सुजात आंबेडकर यांनी वॉर्डा-वॉर्डात फिरून उमेदवारांचा प्रचार केला. तसेच एमआयएमचे ओवेसी हे दोनदा शहरात येऊन गेले आहेत. त्यामुळे शहरात एमआयएमने आपले अस्तित्व दाखवून दिले आहे. मात्र मतदार त्याला कितपत महत्त्व देतात, हे निकालानंतरच स्पष्ट होईल. या व्यतिरिक्त उद्धवसेनेचे आ. नितीन देशमुख यांनी एकहाती प्रचाराची धुरा सांभाळली आहे तर भाजपा-राष्ट्रवादी अजित पवार युतीतील राष्ट्रवादीच्या एकाही वरिष्ठ नेत्याची सभा झाली नाही. तर राष्ट्रवादी शरद पवार गटाचे राजेंद्र शिंगणेंनी आपल्या उमेदवाराचा प्रचार केला. त्यामुळे ही निवडणूक चुरशी होणार असल्याचे चित्र सध्या तरी शहरात दिसून येत आहे.

### अपक्षांवरही राहणार नजर

या निवडणुकीत अपक्षांचीही महत्त्वाची भूमिका असून, त्यांनी आपले स्थान अबाधित ठेवण्यासाठी कंबर कसली आहे. काहींना पक्षात स्थान न मिळाल्यामुळे आपली अपक्ष उमेदवारी दाखल केली आहे. त्यामुळे ते मतांचे विभाजन करू शकतात. असे झाल्यास याचा फटका प्रमुख पक्षांना बसण्याची शक्यता नाकारता येत नाही. काही अपक्ष उमेदवार आपल्या कामामुळे एवढे वजनदार आहेत की ते लोकमतावर निवडून येऊ शकतात. त्यामुळे सर्वच प्रमुख पक्षांची नजर या अपक्ष उमेदवारांवर असणार आहे.






सिटी न्यूज अमरावती

मंगळवार, दि.१३ जानेवारी २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

# विकासाची हमी कमळाकडेच; अमरावतीच्या भविष्यासाठी १ २ ४ योजनांची ठोस गॅरंटी- चंद्रशेखर बावनकुळे

प्रतिनिधी १३ जानेवारी



**अमरावती :** राज्याचे महसूल मंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी अमरावतीच्या सर्वांगीण विकासासाठी १२४ महत्त्वाच्या विकास योजनांची ठोस गॅरंटी जाहीर करत विकासालाच खरी ओळख असल्याचे ठामपणे सांगितले. पंचवटी चौक येथे आयोजित जाहीर सभेत बोलताना त्यांनी स्पष्ट केले की, ङ्गनिवडणुकीतील इतर सर्व चिन्हे भकासाची आहेत, तर कमळ हेच खऱ्या अर्थाने विकासाचे प्रतीक आहे.

या सभेला माजी पालकमंत्री प्रवीण पोटे , सभेचे अध्यक्षस्थान नितीन धांडे यांनी भूषविले. यावेळी किरण महल्ले, भाजपचे उपाध्यक्ष बाळासाहेब वानखडे, भाजपचे नेते सिद्धार्थ वानखडे यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

बावनकुळे यांनी आपल्या भाषणात विकासाच्या चार प्रमुख आधारस्तंभांचा उल्लेख करत सांगितले की, ङ्गविकासाची चार चाकी गाडी चार मजबूत नेतृत्वांच्या आधारावर पुढे सरकत आहे.ङ्ग पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ५५ योजनांचे नियोजन करून देशाला विकासाच्या नव्या वाटेवर नेले, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्रात ४८ महत्त्वाच्या योजनांना गती दिली, तर केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी रस्ते व उड्डाणपूल उभारणीद्वारे पायाभूत सुविधांचा भक्कम पाया रचला. याच परंपरेत आपणही विविध योजना राबवून विकासाला दिशा दिल्याचे त्यांनी नमूद केले.

तसेच, ३० ते ४० हजार रुपयांत सौरऊर्जा आधारित 'सूर्यघर' योजना प्रभावीपणे राबवून सर्वसामान्य कुटुंबांना स्वस्त आणि शाश्वत ऊर्जेचा लाभ देण्याचा संकल्प करण्यात आल्याची माहितीही त्यांनी दिली.

अमरावतीच्या विकासाचा खरा चालक कोण असावा, हे जनतेनेच ठरवायचे आहे,ङ्ग असे सांगत त्यांनी मतदारांना थेट साद घातली. यावेळी त्यांनी जातीपातीच्या राजकारणाला ठाम विरोध दर्शवत, ङ्गमाणसे कर्तृत्वामुळे मोठी होतात; जातिवादातून कधीही विकास साध्य होऊ शकत नाही,ङ्ग असे परखड मत व्यक्त केले.

सभेतून विकास, नेतृत्व आणि दूरदृष्टी यांचा ठोस संदेश देण्यात आला असून, भाजपच अमरावतीच्या उज्ज्वल भविष्यासाठी सक्षम आणि विश्वासार्ह पर्याय असल्याचा दावा करण्यात आला.

# नितेश राणे यांनी केला ओवेसी वर हल्लाबोल

## ◆ भाजप उमेदवारांच्या प्रचारार्थ जाहीर सभा

प्रतिनिधी १३ जानेवारी



**अमरावती :** येथे 'खान, बान आणि पाना' हे चालणार नाही. जर ते जिंकले तर राहणे अवघड होईल. अमरावती महापालिकेत महापौर हा 'आई लव्ह महादेव' असावा. १५ जानेवारीला जर भगव्या रंगाला समर्थन दिले नाही तर १६ तारखेला गल्ली-गल्लीत हिरव्या रंगाचा गुलाल दिसेल. हिंदूंनी जागृत व्हावे. हिंदू राष्ट्र आणि हिंदूंच्या हिताला प्राधान्य द्यावे. हे हिंदू राष्ट्र आहे. इथे धमक्या चालणार नाहीत, असे प्रतिपादन राज्याचे मंत्री तथा भाजपचे नेते नितेश राणे यांनी सोमवारी येथे केले. अमरावती महापालिका निवडणुकीत भाजप उमेदवारांच्या प्रचारार्थ बजरंग नगर मैदानावर आयोजित जाहीर सभेत बोलत होते.

यावेळी मंचावर निवडणूक प्रभारी आमदार संजय कुटे, खासदार डॉ. अनिल बोंडे, माजी मंत्री रणजित पाटील, आमदार राजेश वानखडे, किरण पातुरकर आणि प्रभाग क्रमांक ५ आणि ६ येथील भाजपचे उमेदवार उपस्थित होते. ना. नितेश राणे यांनी विरोधकांवर हल्ला चढवितांना म्हणाले, काहींना मुस्लिम समाजाचा महापौर होईल, असे वाटते. मात्र जर असे झाले तर हिंदू टिळा लावू शकणार नाही, समाज धोक्यात येईल. त्यामुळे मतदारांनी १५ जानेवारीला हिंदू राष्ट्र लक्षात घेऊन मतदान करावे, असे आवाहन त्यांनी केले. दरम्यान खासदार बोंडे यांनी 'बटेंगे तो कटेंगे' या वाक्याचा पुनरुच्चार करीत उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांची आठवण करून दिली. यावेळी अमरावती महानगरप निवडणुकीच्या रिंगणात भारतीय जनता पार्टीचे उमेद भाजपचे पदाधिकारी, का नागरिकांची मोठया संख्येने उपस्थिती होती.

# पी. आर. पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुपमध्ये 'टेकलॉन्स-२०२६' आंतरराष्ट्रीय तांत्रिक महोत्सवाचे भव्य आयोजन

## ◆ विद्यार्थ्यांना ११ लाख रुपयांचे पारितोषिक जिंकण्याची सुवर्ण संधी

प्रतिनिधी १३ जानेवारी



स्वप्निल वानखडे (IAS) | आनंद देशपांडे संचालक पॅरिस्टंट सिस्टीम

**अमरावती :** टेकलॉन्स २०२६ठ या आंतरराष्ट्रीय स्तरावरील भव्य तांत्रिक महोत्सवाचे आयोजन यंदा १७ जानेवारी ते २७ जानेवारी २०२६ या कालावधीत अमरावती येथील पी.आर. पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुपच्या स्वामी विवेकानंद ऑडिटोरिअम मध्ये करण्यात आले आहे. या प्रतिष्ठित सोहळ्याचा शुभारंभ देशाचे माजी राष्ट्रपती व भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या हस्ते झाला असून या महोत्सवा मध्ये सामाजिक, सांस्कृतिक, वैज्ञानिक आणि राजकीय क्षेत्रातील जागतिक ख्यातीच्या व्यक्तिमत्त्वांचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना दरवर्षी मिळते. विद्यार्थ्यांसाठी त्यांच्या नावीन्यपूर्ण संकल्पना आणि प्रकल्प सादर करण्यासाठी ठटेकलॉन्स २०२६ठ हे एक अभूतपूर्व व्यासपीठ आहे. पी. आर. पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुप मधील विविध क्लबसच्या विद्यार्थ्यांच्या या महोत्सवाच्या आयोजना मध्ये मोठ्या प्रमाणात सहभाग राहणार आहे. १९ तारखेला स्मार्ट इंडिया हॅकॅथॉन राहणार असून याचे उद्घाटन श्री आनंद देशपांडे संचालक पॅरिस्टंट सिस्टीम यांच्या हस्ते होणार आहे. या स्पर्धेमध्ये देशभरातील ३०० पेक्षा जास्त विद्यार्थी या स्पर्धेकरिता उपस्थित राहणार आहे. २० जानेवारी २०२६ रोजी आयएएस ऑफिसर श्री स्वप्नील वानखडे साहेब विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणार आहे.

**विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध उपक्रम**

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना देण्याच्या उद्देशाने पी. आर. पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुपच्या वतीने 'टेकलॉन्स–२०२६' अंतर्गत विविध उपक्रमांची सविस्तर आणि प्रभावी मालिका राबविण्यात येणार आहे. या उपक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचा शारीरिक, बौद्धिक, मानसिक, सांस्कृतिक तसेच आध्यात्मिक विकास साधण्यावर भर देण्यात आला आहे.

# डॉ. भाऊसाहेब देशमुख जयंती उत्सवात प्रा. भारसाकळेंचा कार्य गौरव

## ◆शिक्षण व कृषी क्षेत्रात सेवा कार्य ही सार्थ सेवा- हर्षवर्धन देशमुख ◆संशोधन कार्य हे शिक्षणातील सर्वोच्च कार्य- हेमंत काळमेघ

प्रतिनिधी १३ जानेवारी



**दर्यापूर:** डॉ पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांनी समाजाला निर्देशित शिक्षण व कृषी क्षेत्रातील कार्याची ज्योत तेवत ठेवणे हे आपले कर्तव्य असून प्रत्येकाने या दोन्ही क्षेत्रात योगदान द्यावे असे मार्गदर्शक विधान अमरावतीच्या श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष तथा राज्याचे माजी कृषीमंत्री हर्षवर्धन उपाख्य भैय्यासाहेब देशमुख यांनी केले . संस्थेच्या स्थानिक रत्नाबाई राठी हायस्कूल येथे शिवपरीवारातील सदस्य प्रा.गजानन रामकृष्ण भारसाकळे यांच्या संशोधन कार्याचा गौरव डॉ . भाऊसाहेब जयंती उत्सवा निमित्याने विद्यालयात संपन्न संपूर्ण महोत्सव समारंभाचे अध्यक्ष या नात्याने संस्थाध्यक्ष हर्षवर्धन देशमुख यांनी अध्यक्षीय भाषणातून केले . संस्थेचे विद्यमान कार्यकारिणी सदस्य तसेच प्रा. गजानन भारसाकळे यांचे जिवलगमित्र हेमंत वासुदेवराव काळमेघ यांनी प्रा. भारसाकळे यांना सत्काराप्रसंगी गौरव मंचावर हृदयाशी कळवटाळून त्यांच्या समाज, पर्यावरण सेवेसह बहुमूल्य संशोधन कार्याची मुक्तकंठाने प्रशंसा केली . संशोधन कार्य हे शिक्षणातील सर्वोच्च कार्य असल्याचे त्यांनी या प्रसंगी विषद केले .या जयंती महोत्सव मंचावर शिक्षक आमदार किरणजी सरनाईक, संस्थेचे उपाध्यक्ष ॲड. भैय्यासाहेब पाटील पुसदेकर , कार्यकारिणी सदस्य प्राचार्य केशवराव गावंडे , सुरेशदादा खोटरे , प्रा सुभाष बनसोड , माजी उपाध्यक्ष डॉ . रामचंद्र शेळके तसेच श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावतीचे आजीवन सभासद डॉ वसंतराव टाले, प्रल्हादराव मुळे, सौ . भारतीताई काळे,सौ .रजनीताई टाले, शेषरावजी काळे तथा हायस्कूलचे मुख्याध्यापक विलास प्रल्हादराव मुळे यांची प्रमुख उपस्थिती तथा सभामंडपात संस्थेचे आजीवन सभासद ॲड श्रीरंग पाटील अरबट, डॉ दिनकरराव गायगोले, प्रा. प्रभाकरराव कोलखेडे यांचे सह प्रभाकरपाटील कोरपे, विनायकराव गावंडे, राजेंद्र गायगोले, गोपाळराव बारब्दे या संस्थेतील माजी मुख्याध्यापकांची विशेष उपस्थिती लाभली . रत्नाबाई राठी या विद्यालयात प्रा गजानन भारसाकळे यांचे वडील तथा संस्थेचे आजीवन सभासद स्व. रामकृष्ण आत्मारामजी भारसाकळे यांनी नियुक्ती ते सेवा निवृत्ती या दिर्घकाळ प्रदान केलेल्या शिक्षक सेवेमुळे या सत्काराला विशेष महत्व प्राप्त असल्याची प्रतिक्रिया प्रा. गजानन भारसाकळे यांनी या प्रसंगी आमच्या वृत्त पत्राच्या स्थानिक प्रतिनिधीस देतांना विद्यालयाला माझा संपूर्ण परिवार आयुष्यभर सर्वोतापरी सहकार्याचे सातत्य कायम ठेवेल असे भावपूर्ण प्रतिपादन केले . कार्यक्रमास गावातील प्रतिष्ठित नागरीक, विद्यालयाचे आजी -माजी विद्यार्थी, शिक्षक व कर्मचारी वृंद यांची भरगच्च उपस्थिती होती . कार्यक्रमाचे संचलन शिक्षिका ज्यूली जामठे, प्रास्ताविक विलास मुळे तथा आभार प्रदर्शन श्रीकृष्ण करडे यांनी केले .

# मतदानासंदर्भात निवडणूक विभागाच्या गाईडलाईन

प्रतिनिधी १३ जानेवारी

**अमरावती :** अमरावती महानगरपालीका अमरावती सार्वत्रीक निवडणुक-२०२६ मतमोजणी दिनांक १६ जानेवारी २०२६ रोजी डॉ. पंजाबराव देशमुख क्रिडा व वाणिज्य संकुल, (महानगरपालीका) नवसारी, अमरावती येथे सकाळी १०.०० वा. पासुन आयोजीत आहे. तत्पूर्वी दिनांक १५.०१.२०२६ रोजी मतदान प्रक्रीया आटोपल्यानंतर मतदान केंद्रावरील ऋ्निं मशीन, कंट्रोल युनीट, ऋ्ईिऊ, इत्यादी साहित्य घेवून वाहनांची वर्दळ मतमोजणी केंद्र परिसरात मोठ्या प्रमाणात राहणार आहे. दिनांक १६.०१.२०२६ रोजी मतमोजणी प्रक्रीया करीता सकाळी ०८.०० वा. पासुन संबंधीत अधिकारी, उमेदवार, मतमोजणी प्रतिनिधी तसेच सर्वसामान्य नागरिक हे मतमोजणी केंद्र महानगरपालीका क्रिडा संकुल, नवसारी परिसरात दाखल होतील. यादरम्यान मतमोजणी केंद्रासमोरील मार्गावर वाहतुक कोंडी/अपघात यासारख्या घटना व कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होवु नये या करीता मा. पोलीस उपायक्त (मुख्यालय) अम. शहर यांनी वरिष्ठांच्या आदेशाने खालीलप्रमाणे वाहतुक मार्गात बदल व पर्यायी मार्गाने वाहतुक वळविण्यासंबंधाने अधिसुचना (आदेश) जारी केले आहे.

**प्रवेश बंदी मार्ग:** कठोरा ते छ. संभाजी राजे चौक (राजपुत धाबा) चौक पर्यंत

**कालावधी:** गुरुवार दिनांक १५.०१.२०२६ चे रात्री २२.०० वा पासुन शुक्रवार दिनांक १६.०१.२०२६ चे संपुर्ण मतमोजणी प्रक्रीया संपे पावेतो

**पर्यायी मार्ग -**

अ) पंचवटी कडुन नवसारी कडे जाणाऱ्या सर्व वाहनांनी कठोरा नाका-रंगोली लॉन-कठोरा जकात नाका या पर्यायी मार्गाचा वापर करावा.

ब) राजपुत धाबा कडुन पंचवटी कडे येणाऱ्या सर्व वाहनांनी पर्यायी मार्ग राजपुत धावा-रिंगरोड - पोटे पाटील चौक कठोरा नाका (फक्त एस टी बस व प्रवासी वाहनांकरीता) किंवा राजपुत बाबा- रिंगरोड पोटे पाटील चौक रहाटगांव टी पॉइंट या मार्गाचा अवलंब करावा.

वाहतुक विभाग, अमरावती शहर व्दारे सर्व वाहन चालकास याव्दारे सुचीत करण्यात येते की, वरीलप्रमाणे गुरुवार दिनांक १५.०१.२०२६ चे रात्री २२.०० वा पासुन शुक्रवार दिनांक १६.०१.२०२६ चे संपुर्ण मतमोजणी प्रक्रीया संपे पावेतो वाहतुक मार्गात बदल संबंधाने जारी आदेश/अधिसुचनेचे जो कोणी वाहनचालक पालन करणार नाही त्यांचे विरुध्द मोवाका १९८८ व महाराष्ट्र पोलीस कायदा १९५१ अन्वये कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल याची सर्वांनी नोंद घ्यावी. जड वाहन प्रवेश बंदी संबंधाने दिनांक १७/११/२०२६ रोजी पारीत अधिसुचना कार्यान्वीत असुन सदर अधिसुचना सोबत नव्याने जारी आदेशाचे पालन करणे आवश्यक राहील,

पोलीस आयुक्तालय, अमरावती शहर व वाहतुक विभाग, अमरावती शहर कडून सर्व नागरिकांना याव्दारे जाहीर आवाहन करण्यात येते की, आदेशात नमुद कालावधीत घातलेल्या निबंधाचे सर्व वाहन चालकांनी काटेकोरपणे पालन करुन पोलीस विभागास आवश्यक सहकार्य करावे.

# जिल्हाधिकारी कार्यालयात जिजाऊ माँ साहेब, स्वामी विवेकानंद जयंती साजरी



प्रतिनिधी १३ जानेवारी

**अमरावती:** जिल्हाधिकारी कार्यालयात जिजाऊ माँ साहेब आणि स्वामी विवेकानंद जयंती साजरी करण्यात आली. जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

यावेळी अपर जिल्हाधिकारी गोविंद दानेज, निवासी उपजिल्हाधिकारी संतोष काकडे, उपजिल्हाधिकारी विवेक जाधव, प्रसेनजित चव्हाण, दुर्गा देवळे, विधी अधिकारी नरेंद्र बोहरा, माहिती तंत्रज्ञान अधिकारी मनिषकुमार, जिल्हा खनिकर्म अधिकारी प्रणिता चाफले आदी उपस्थित होते. उपस्थित जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी, कर्मचारी यांनीही जिजाऊ माँ साहेब व स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेला पुष्प अर्पण करून अभिवादन केले.

# मंदाकिनी ठोसरे चर्मकार समाजातील एकमेव दलित उमेदवार रिंगणात

प्रतिनिधी १३ जानेवारी



**अमरावती :** अमरावती शेगाव आडगाव प्रभाग क्रमांक एक मध्ये उद्धव बाळासाहेब ठाकरे मशाल या चिन्हावर अनुसूचित जाती मधून चर्मकार समाजातील एकमेव हिंदू दलित म्हणून मंदाकिनी मिक्सम ठोसरे उर्फ खंडारे यांना चांगला प्रतिसाद मिळत असून तसेच ओबीसी मधून अंकित भस्मे व ओपन मधून दिलीप काकडे यांना प्रभागातील जनतेकडून चांगला प्रतिसाद मिळत असल्याचे दिसून येत आहे. तरी उमेदवार मंदाकिनी ठोसरे ह्या चर्मकार समाजाच्या जिल्ह्याच्या पदाधिकारी असूनअमरावतीतील चर्मकार समाजाचा त्यांना पाठिंबा आहे.

## निधन वार्ता

### हेमेंद्र तिवारी



**अकोला:** सिटी चॅनलचे प्रतिनिधी रामधन तिवारी यांचे धाकटे बंधू हेमेंद्र तिवारी (३५) यांचे रविवारी रात्री निधन झाले. काही दिवसांपासून ते आजारी होते.

सिटी न्यूज सुपरफास्ट — खामगाव

# केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांच्या नेतृत्वाखाली शिवसेना खामगाव विधानसभा पदाधिकाऱ्यांची बैठक

प्रतिनिधी १३ जानेवारी

**खामगाव :** केंद्रीय मंत्री ना.प्रतापराव जाधव साहेब यांच्या सूचनेनुसार शिवसेना खामगाव विधानसभा पदाधिकाऱ्यांची महत्त्वाची आढावा बैठक संपन्न स्थानिक शिवसेना कार्यालय येथे ११ जानेवारी रोजी संपन्न झाली या बैठकीचे अध्यक्षस्थानी शिवसेनेचे जिल्हाप्रमुख संतोष डिवरे पाटील हे होते तर प्रमुख उपस्थितीत हिंदू सेवक अँड अमोल अंधारे , शेगाव उपजिल्हाप्रमुख राजू मिरगे,खामगाव तालुकाप्रमुख राजेंद्र बघे, शेगाव तालुकाप्रमुख रामा धारकर , शिवसेना शहर प्रमुख चेतन ठोंबरे यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते. या बैठकीच्या अध्यक्षस्थानी असलेले शिवसेना जिल्हाप्रमुख संतोष डीवरे पाटील यांनी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले यावेळी ते म्हणाले की गाव तिथे शाखा, प्रत्येक घरात शिवसैनिक असा नारा दिला तसेच आगामी होणाऱ्या जिल्हा परिषद पंचायत समिती ग्रामपंचायत निवडणुकीकरिता शिवसैनिकांनी सज्ज राहावे असे आवाहनही त्यांनी यावेळी केले प्रत्येक गावामध्ये बूथ निहाय शिवसैनिकांची यादी करावी, पंचायत समिती गणनिहाय सुद्धा शिवसैनिकांची वेगळी फळी निर्माण करावी व होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांवर शिवसेनेचा भगवा फडकवावा अशी घोषणा त्यांनी यावेळी केली. तसेच नुकताच शिवसेना पक्ष प्रवेश झाल्यानंतर उपस्थित एडवोकेट अमोल अंधारे यांचा शिवसेना खामगाव विधानसभेच्या वतीने सत्कार करण्यात आला.प्रथमच भव्य पक्षप्रवेश सोहळा व कार्यकर्ता मेळाव्याचे आयोजन १७ जानेवारी रोजी श्री हरी लॉन्स सुटाळा खामगाव येथे करण्यात आले असून हिंदुत्ववादी संघटनेतील कार्यकर्त्यांनी मोठ्या संकेत उपस्थित राहण्याचे आवाहन केले.

यावेळी शिवसेना तालुकाप्रमुख खामगाव राजेंद्र बघे यांनी सूत्रसंचालन केले. आयोजित करण्यात आलेल्या शिवसेना मेळाव्याच्या नियोजनासाठी सविस्तर बैठक संपन्न झाली.

# विविध मागण्यांसाठी उपविभागीय अधिकारी कार्यालयासमोर धरणे

## ◆अन्याय व अत्याचारप्रकरणी तातडीने कारवाईची मागणी

प्रतिनिधी १३ जानेवारी

**खामगाव :**अनुसूचित जाती-जमातीतील नागरिकांवर होत असलेल्या अन्याय व अत्याचारप्रकरणी तातडीने कारवाई करण्यात यावी, यासह विविध मागण्यांसाठी खामगाव येथील उपविभागीय अधिकारी यांच्या कार्यालयासमोर अनुसूचित जाती-जमातीतील नागरिकांनी ११ जानेवारीपासून धरणे आंदोलन सुरू केले आहे. या संदर्भात आंदोलनकर्त्यांनी उपविभागीय अधिकारी यांना निवेदन सादर केले आहे. निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, खामगाव ग्रामीण पोलिस ठाण्यात अट्रॉसिटी अक्ट अंतर्गत दाखल झालेल्या गुन्ह्यातील आरोपींना तत्काळ अटक करण्यात यावी. तसेच खामगाव ग्रामीण येथील गुन्ह्यातील आरोपी व त्यांचे नातेवाईक यांच्याविरुद्ध खोटा अदखलपात्र गुन्हा नोंदविणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यावर कारवाई करून तो गुन्हा रद्द करण्यात यावा.

यासोबतच उपविभागीय पोलिस अधिकारी तसेच तपास अधिकाऱ्यांनी कर्तव्यात कसूर केल्याचा आरोप करत त्यांची चौकशी करून योग्य ती कारवाई करण्याची मागणीही करण्यात आली आहे. अशा विविध मागण्यांसाठी हे आंदोलन सुरू असून, या धरणे आंदोलनात अनुसूचित जाती-जमातीतील महिला व नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले आहेत.



सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम

मंगळवार दि. १३ जानेवारी २०२६

http://epaper.citynewssuperfast.com

शालार्थ आयडी घोटाळा, पैसा केला गोळा...



# एसआयटी चौकशी लांबली, कारवाईची प्रक्रिया थांबली !

घोटाळा पुन्हा पुन्हा दाखल होणार गुन्हा

## दिड लाख शिक्षकांचा पगार थांबणार *कारवाईची प्रक्रिया लांबणार

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

**शिक्षण विभागाच्या भरती घोटाळयाचा शुभारंभ वाशीम जिल्ह्यातूनच झाला. २५ वर्षापासून बोगस शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची बॅकडेटमध्ये थेट भरती करण्यात आली. भरती घोटाळयाचे २०१४ मध्ये वृत्त मालिकेतून सिटी न्युज सुरपफास्टने प्रकरण उघडकीस आणले. त्यानंतर २ शिक्षण अधिकाऱ्यांना निलंबीत करून अनेक शाळांवर गुन्हे दाखल करण्यात आले. आता पवित्र पोर्टल वरून न्यायालयाने शिक्षण विभागाला खडे बोल सुनावले आहे. पवित्र पोर्टल हे संस्था चालकांनी अपवित्र ठरवून शिक्षण विभागातही भ्रष्टाचाराचे वेगळे चित्र निर्माण झाले आहे. वाशीम जिल्ह्यात भरती घोटाळातर विचित्र आहे.सरस्वतींच्या कार्यालयात लक्ष्मीदर्शनाशिवाय काम होत नसल्याचे सिध्द झाले आहे. न्यायालयाच्या आदेशाने शिक्षण विभागाला आता पोर्टल वरून ताशेरे ओढल्या जात आहे. बोगस शिक्षक भरती शालार्थ आयडी प्रकरणाची एसआयटी विभागीय चौकशी सुरू असून ही प्रक्रिया लांबली असून कारवाईची प्रक्रियाही थांबली आहे.**

* बोगस शिक्षक भरती, शालार्थ आयडी प्रकरण, शिक्षण विभागाचे भ्रष्टधोरण, गरीबांचे मरण
* अमरावती येथील शिक्षण उपसंचालक कार्यालयात एसआयटी चौकशी होणार
* तक्रारकर्ते, तत्कालीन व विद्यमान शिक्षणाधिकारी, संस्था अध्यक्ष, सचिव, मुख्याध्यापक हजर राहणार
* एसआयटी चौकशी अधिकाऱ्यांनी पारदर्शक चौकशी केल्यास शिक्षण क्षेत्रातील मोठा भ्रष्टाचार उघडकीस येणार




शिक्षण विभागातील बोगस शिक्षक भरती, शालार्थ आयडी प्रकरणाच्या एसआयटी चौकशीला प्रारंभ अमरावती येथील शिक्षण उपसंचालक कार्यालयात एसआयटी चौकशी होणार आहे. तक्रारकर्ते, तत्कालीन व विद्यमान शिक्षणाधिकारी, संस्था अध्यक्ष, सचिव, मुख्याध्यापक या चौकशीला हजर राहणार असून अमरावती विभागाचे शिक्षण मंडळाचे अध्यक्ष व शिक्षण उपसंचालक यांची भूमिका संशयास्पद एसआयटी चौकशी अधिकाऱ्यांनी पारदर्शक चौकशी केल्यास शिक्षण क्षेत्रातील मोठा भ्रष्टाचार उघडकीस येणार आहे. वाशीम जिल्ह्यात माध्यमिक व प्राथमिक शिक्षण विभागात मोठ्या प्रमाणात बोगस शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी भरती झाल्याबाबत सिटी न्यूज सुपरफास्ट ने वृत्तमालिका प्रकाशित केला आहे.तसेच शिक्षण विभागातील मोठ्या घोटाळ्याची एसआयटी मार्फत चौकशी करण्याची मागणी पण सिटी न्युज सुपरफास्ट ने केली होती.अखेर शासनाने शिक्षण विभागातील बोगस पददभरती व बोगस शालार्थ आयडी प्रकरणाची सखोल चौकशी करण्यासाठी अमरावती येथील विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालयात तक्रारकर्ते नागरिक आणि संबंधित संस्थेचे आजी-माजी अध्यक्ष, सचिव, मुख्याध्यापक यांना सविस्तर चौकशीस हजर राहण्याचे आदेश दिल्याची माहिती प्राप्त झाली आहे. मात्र अद्यापही चौकशी प्रक्रिया लांबली असून कारवाई थांबली असल्याची माहिती आहे. या एसआयटी चौकशीने शिक्षण क्षेत्रातील अनेकांची त्रेधातिरपट होणार आहे.चौकशी अधिकाऱ्यांनी ही चौकशी अतिशय पारदर्शकपणे करुन सर्व भ्रष्टांवर कडक फौजदारी कारवाई करण्याची मागणी शिक्षण क्षेत्रातील प्रामाणिक लोकांकडून केल्या जात आहे.

**शिक्षण मंडळाचे अध्यक्ष आणि शिक्षण उपसंचालक यांचे कार्यप्रणालीवर प्रश्नचिन्ह**

अमरावती विभागाच्या शिक्षण उपसंचालकांसह शिक्षण मंडळाचे आजी-माजी अध्यक्ष सुद्धा शालार्थ आयडी घोटाळ्यासह बोगस पदभरती प्रकरणात सहभागी असून त्यांनी सुद्धा मोठ्या प्रमाणात अपसंपदा गोळा केल्याची शिक्षण विभागात चर्चा आहे.अशा भ्रष्ट अधिकाऱ्याना या पारदर्शक चौकशी मध्ये एसआयटी ने लांबच ठेवून या महाघोटाळ्याची सखोल चौकशी करून सर्व दोषींवर तात्काळ फौजदारी कारवाइ करावी अशी मागणी शिक्षणप्रेमी जनतेकडून होत आहे.

### शिक्षक होणार गार, बंद होणार पगार...

जिल्ह्यातील माध्यमिक व प्राथमिक शिक्षण विभागाला भ्रष्टाचाराने पोखरून वाळवी लावली आहे. बॅकडेट बोगस भरती, समायोजन बोगस भरती, शाळा वाटपात नाही पाहिले अंतर, भ्रष्टाचार निरंतर, शालार्थ आयडी घोटाळा, टिईटी घोटाळा अशा शिक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांविरुद्ध गंभीर तक्रारी आल्याने आता चौकशीची प्रक्रिया सुरू झाली आहे. शालेय शिक्षण आणि क्रीडा विभागाने ९ सप्टेंबर रोजी पुणे येथील शिक्षण आयुक्तांना पत्र पाठवून या प्रकरणात तातडीने चौकशी करून कार्यवाही करण्याचे आदेश दिले आहेत. त्यामुळे आता चौकशीचे सत्र सुरू झाले असून कारवाईचे पत्र धडकल्याने शिक्षण विभागात खळबळ उडाली आहे.




### घोटाळा आला गळ्यात, मोठा मासा जाळ्यात...

रविंद्र काटोलकर २४ डिसेंबर २०२१ रोजी नागपुरात प्राथमिक शिक्षणाधिकारी म्हणून रुजू झाले. २० मार्च २०२२ पर्यंत ते जिल्हा परिषदेत असताना त्यांना अनेक शिक्षण व कर्मचाऱ्यांचे शालार्थ आयडी बनावट असल्याची माहिती होती. परंतु वेतन संबंधात शाळेकडून आलेल्या प्रस्तावाची कुठलीही शहानिशा न करता त्यांचे थकीत वेतन देण्याची प्रक्रिया राबविली. त्यातून त्यांनी शासनाची १२ कोटींपेक्षा अधिक रकमेची शासनाची फसवणूक केल्याच्या प्रकरणी त्यांना अटक करण्यात आली. शालार्थ आयडी घोटाळ्यातील अटकेतील आरोपींची संख्या आता एकूण २७ वर गेली आहे. यामध्ये तीन शिक्षण उपसंचालक, चार शिक्षणाधिकारी, वेतन अधीक्षक, तीन मुख्याध्यापक, दोन शाळा संचालक यांच्यासह सहायक शिक्षक, सहा लिपीक व कनिष्ठ लिपीकांचा समावेश आहे. अशाच प्रकारची शालार्थ आयडी घोटाळ्याची चौकशी वाशीम जिल्ह्यात झाल्यास अनेक मोठे मासे गळाला लागण्याची शक्यता आहे .

### घोटाळा पुन्हा पुन्हा , दाखल होणार गुन्हा...

शालेय शिक्षण विभागातील शालार्थ आयडी घोटाळ्यात नागपूर विभागात दाखल गुन्ह्यांची चौकशी करणाऱ्या विशेष तपास पथकाला आता राज्यभरातील गुन्ह्यांची चौकशी करण्याचे अधिकार देण्यात आले आहेत. नागपूर शहरातील पोलिस उपायुक्त नित्यानंद झा हे या एसआयटीचे प्रमुख आहेत. शालार्थ घोटाळ्यात जिथे जिथे राज्यात गुन्हे दाखल झालेले आहेत तिथे तिथे चौकशी करण्याचे काम आता ही एसआयटी करेल. विशेष पोलिस महानिरीक्षक (कायदा व सुव्यवस्था) मनोज शर्मा यांनी अलिकडेच या संबंधीचा आदेश काढला आहे. शालार्थ आयडी घोटाळ्याप्रकरणी चाळीसगाव (जि. जळगाव) येथे तीन गुन्हे नोंदविण्यात आले आहेत. स्थानिक पोलिस त्याची चौकशी करत आहेत.

### दोन शिक्षण अधिकारी निलंबीत

### भरती घोटाळ्याचा २०१४पासून सिटी न्युज सुपरफास्टचा पाठपुरावा...

वाशीम जिल्ह्यातील शिक्षण विभागातील बोगस भरतीची चौकशी नोव्हेंबर २०१४ मध्ये करुन वाशीम जिल्ह्यातील माध्यमिक शिक्षण विभागातील पाचशेच्या जवळपास बोगस भरतीची यादी तयार केली होती.तत्कालीन शिक्षणाधिकारी लबडे व तेलगोटे यांना अकोला येथील एका प्रतिष्ठीत हॉटेलमध्ये ३१ डिसेंबर २०१४ च्या रात्री बोलावून वाशीम जिल्ह्यातील बोगसभरती प्रकरण रफादफा करण्यासाठी चक्क 'एक खोक्याची' मागणी केली होती, पण त्या दोन्ही 'धुर्त' अधिकाऱ्यांनी पवार यांची खोक्याची मागणी फेटाळून पावारांनाच चॅलेंज केले.नंतर संतापलेल्या पवारांनी वाशीम जिल्ह्यातील अनसिंग, आसेगाव, मंगरूळपिर, कारंजा ग्रामिण पोलीस ठाण्यात बोगसभरती केलेल्या संस्थाचालक, कर्मचारी आणि लबडे ,तेलगोटे या अधिकाऱ्यांवर फौजदारी गुन्हे दाखल केले असल्याचीही शिक्षणक्षेत्रात चर्चा आहे.या प्रकरणी सिटी न्युज सुपरफास्टने सर्वप्रथम शेकडो वृत्ताची वृत्त मालिका चालविली. काही शाळांनी तर खोटे वृत्त छापल्यामुळे सिटी न्युज सुपरफास्टवरच गुन्हे दाखल केले आहेत.

## थोडक्यात

### नागोबा संस्थानच्या वतीने महाप्रसादाचे आयोजन



● सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर ●

मंगरूळपीर जवळच असलेल्या गट ग्रामपंचायत दस्तापुर अंबापुर या ठिकाणी १२ जानेवारी रोजी नागोबा संस्थान च्या वतीने महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.या कार्यक्रमाला जि.प.चे माजी अध्यक्ष तथा राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष चंद्रकांत दादा ठाकरे यांनी नागोबाचे दर्शन घेऊन महाप्रसादाचा लाभ घेतला. तसेच अंबापुर केवळ ७० घरी असलेली वस्ती व सर्व काबाडकष्ट करून रोजगार मिळवणारी युवक मंडळी यांनी पुढाकार घेऊन कार्यक्रम चांगल्या प्रकारे साजरा केला.या कार्यक्रमामध्ये दस्तापुर येथील प्रतिष्ठित मंडळी व युवकांनी सहभाग नोंदवून कार्यक्रम चांगल्या प्रकारे कसा करता येईल यासाठी प्रयत्न केले. या कार्यक्रमाला जि.प. माजी सदस्य आर के राठोड सरपंच सुरेश राठोड सावरगाव कान्होबा डेबा आटपाडकर, श्रीमंत खांडेकर,विश्वनाथ आटपाडकर मुकेश मुंजे ,विनोद खंडरे पत्रकार रमेश मुंजे, सह मान्यवर उपस्थित होते. अंबापुर येथील जामनिक इंगळे या सर्व मंडळींनी उत्साहाने कार्यक्रम साजरा केला परिसरातील अनेक भाविक भक्तांनी महाप्रसादाचा लाभ घेतला.

### जि.प.शाळेत विविध कार्यक्रमाचे आयोजन

● सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर ●

मंगरूळपीर येथे पी एम श्री जिल्हा परिषद माध्यमिक विद्यालय व कनिष्ठ विज्ञान महाविद्यालय येथे आपत्ती व्यवस्थापन कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. या कार्यशाळेत मंगरूळपीर येथील तहसीलदार सुधाकर अनासुने , जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी शाहू भगत, संजय तेलंग व निलेश मिसाळ , हे उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्रीमान काळे सर यांनी तर आभार प्रदर्शन देवांगना लहानगे मॅडम यांनी केले. या कार्यशाळेचे आयोजन शाळेचे प्राचार्य श्री संजय टिकस यांनी केले व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी शाळेच्या पर्यवेक्षिका साबळे मॅडम, शिक्षिका बडगे मॅडम शेळके मॅडम वैद्य मॅडम, राठोड सर, मुसळे सर सावके सर, सरोदे सर दवणे सर, मोरे सर व सर्व विद्यार्थी उपस्थित होते.

# सिध्द झाली गुन्हेगारी, दाखल करा फौजदारी !

## *जवळा येथील बनावट फेरफार प्रकरण * दोषींविरूद्ध फौजदारी कारवाई होण्यासाठी चाटे यांची न्यायालयात धाव

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

रिसोड तालुक्यातील जवळा येथील रमेश चाटे यांची जमिन महसूल विभागातील संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांनी बनावट आदेश काढून जाधव यांचे नावाने फेरफार केला.या प्रकरणी रमेश चाटे यांनी रिसोड पोलीस ठाण्यात तक्रार दिली.परंतु पोलिसांनी 'या' तक्रारीची दखल घेतली नाही.शेवटी रमेश चाटे यांनी 'या' प्रकरणातील सर्व दोषींविरूद्ध फौजदारी कारवाई व्हावी यासाठी रिसोड येथील प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी यांचे न्यायालयात प्रकरण दाखल केले आहे.

रिसोड तालुक्यातील जवळा येथील रमेश चाटे यांची वडीलोपार्जित व मालकी हक्काची गट क्रमांक ५/ १ मध्ये १.१६ आर जमिन आहे. ही जमिन गैरअर्जदार प्रकाश गणा जाधव व रमेश तुकाराम जाधव यांनी तलाठी, मंडळ अधिकारी, नायब तहसिलदार यांचेशी संगनमत करून बनावट आदेश तयार करून चाटे कुटुंबाला कोणतीही नोटीस न देता जाधव यांचे नावाने फेरफार नोंदविला. या बनावट नोंदीची व कथित फेरफाराची माहिती चाटे यांना मिळताच त्यांनी 'या' प्रकरणातील आदेश मिळण्यासाठी तहसिलदारांकडे अर्ज केला. संबंधित अधिकाऱ्यांनी सुरूवातीला रमेश चाटे यांना त्या आदेशाबाबत माहिती देण्यासाठी टाळाटाळ केली. जेव्हा हे बनावट फेरफार क्रमांक १२९९ चे प्रकरण भ्रष्ट अधिकाऱ्यांच्या अंगलट येणार असल्याचे कळताच 'त्या' भ्रष्ट अधिकाऱ्यांनी रा.मा.क्र.आर.



टी. एस.-५९/ जवळा/ १३५/ २०२५ असा आदेश तहसिल प्रशासनाने काढलाच नाही, आणि हे प्रकरण त्यांच्या कार्यालयात सुरूच नसल्याची माहिती पत्राद्वारे रमेश चाटे यांना दिली.त्यानंतर रमेश चाटे यांनी प्रथम रिसोड पोलिस ठाण्यात 'या' बनावट फेरफार प्रकरणात सहभागी असलेल्या सर्वांच्या विरोधात पोलिसांनी फौजदारी कारवाई करण्यासाठी पुराव्यासह तक्रार दिली.परंतु रिसोड पोलिसांनी चाटे यांच्या गंभीर तक्रारीकडे दुर्लक्ष करून या बनावट फेरफार प्रकरणातील आरोपींना अभय दिला. शेवटी रमेश चाटे यांनी या प्रकरणात सहभागी असलेल्या सर्व दोषींविरूद्ध फौजदारी कारवाई व्हावी, चाटे कुटुंबाला न्याय मिळावा यासाठी रिसोड येथील प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी यांचे न्यायालयात प्रकरण दाखल केले आहे.सद्या हे प्रकरण न्यायप्रवीष्ठ अहे.तसेच रमेश चाटे यांनी बनावट फेरफार रद्द करण्यासाठी उपविभागीय अधिकारी, वाशीम यांचेकडे अपील सुद्धा दाखल केले आहे.या प्रकरणात रमेश चाटे व चाटे कुटुंबीय यांचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान झाले




आहे.तसेच शारीरिक व मानसिच त्रासही त्यांना सहन करण्याची वेळ आली आहे.

# बंद करा अवैध दारू विक्री अन् जुगार, अवैध धंद्यांच्या विरोधात महिलांचा एल्गार !

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

वाशिम शहरात वाढत चाललेल्या अवैध दारूविक्री, जुगार अड्डे व तत्सम बेकायदेशीर धंद्यांमुळे सामाजिक वातावरण बिघडत असून, याचा थेट परिणाम कुटुंबव्यवस्था, महिला व तरुण पिढीवर होत असल्याची गंभीर बाब समोर आली आहे. या पार्श्वभूमीवर वज्रदेही महिला विकास संघा, वाशिमच्या वतीने जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयाकडे निवेदन सादर करण्यात आले आहे.







### वज्रदेही महिला विकास संघाचा पुढाकार

संघटनेने आपल्या निवेदनात नमूद केले आहे की, शहरातील अनेक भागांमध्ये खुलेआम अवैध दारूविक्री, जुगार, वरली मटका, एक्का-बादशहा, टिपन-भवर यांसारखे प्रकार दिवसरात्र सुरू असून, काही ठिकाणी हे धंदे पोलिसांच्या नाकावर टिच्चून चालू असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. या अवैध व्यवसायांमुळे परिसरातील शांतता भंग पावत असून, वृद्ध नागरिक, महिला तसेच लहान मुले असुरक्षिततेच्या भावनेत जीवन जगत आहेत. अनेक कुटुंबांचे संसार उद्ध्वस्त होत असून, आर्थिक आणि मानसिक त्रास वाढत असल्याचे संघटनेने स्पष्ट केले आहे.

संघटनेने हेही नमूद केले की, काही वेळा कारवाईचे दिखाऊ प्रयत्न झाले असले तरी ती कारवाई तात्पुरती ठरत असून, संबंधित अवैध धंदे पुन्हा जोमाने सुरू होत असल्याने नागरिकांमध्ये नाराजी आहे. त्यामुळे कायमस्वरूपी आणि ठोस कारवाई होणे आवश्यक असल्याची अशी मागणी वज्रदेही महिला विकास संघाच्यावतीने आरती संतोष ठोके सह महिलांनी केली आहे.

### अनसिंग येथील साई मंदिरात हजारो भाविकांनी घेतला महाप्रसाद

● सिटी न्युज ब्युरो @ अनसिंग ●

येथील श्री साई संस्थान चॅरीटेबल ट्रस्टच्यावतीने साईमंदिरात ११ जानेवारी रोजी श्रीमद भागवत सप्ताहानिमित्त आयोजित महाप्रसादाचा पंचक्रोशीतील हजारो भाविकांनी लाभ घेतला. रविवार ११ जानेवारी रोजी सकाळी ९ वाजता आळंदी येथील ह.भ.प.वात्स्ल्यमुर्ती माधव बाबा इंगोले यांचे काल्याचे किर्तन झाले. त्यानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले.

या महाप्रसादाला अनसिंग पंचक्रोशीतील अनसिंग, खडसिंग, देगांव, एकांबा, सापळी, जवळा, उमरा कापसे, उमरा मोठा, शेलु बुद्रुक, शेलु खुर्द, उमराळा, सोंडा, पिंपळगाव, ब्रम्हा, वाई, वारला, ढिल्ली, घोटा, सावळी, पन्हाळा, निंबाळवाडी, टणका, जयपूर,



चिंचखेडा, नांदगाव, शिवणी व परिसरातील हजारो भाविकांनी हजेरी लावली. या महाप्रसादाच्या शिस्तबद्ध आयोजनासाठी श्री साई संस्थानचे अध्यक्ष राजु शृंगारे, उपाध्यक्ष विलास ठाकूर, सचिव चंद्रकांत देवळे, सहसचिव नंदकिशोर गावंडे, कोषाध्यक्ष कुंडलिक भोयर, विश्वस्त दीपक निंबेकर, ज्ञानबा पुंड, गजेंद्र देवळे, संजय जवंजाळे यांचेसह येथील निवासी मूकबधीर विद्यालयातील शिक्षक वृंद, शिक्षकेतर कर्मचारी आणि वारकरी मंडळीने पुढाकार घेतला.

सिटी न्यूज अकोला
मंगळवार, दि. १३ जानेवारी २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

## काँग्रेस गटाचे श्यामशील भोपळे शिवसेना शिंदे गटात दाखल



**हिवरखेड:** शहरात ४० वर्षापासून श्यामशील भोपळे हे काँग्रेस पक्षाचे निष्ठावंत कार्यकर्ते म्हणून त्यांची ओळख होती. मागच्या महिन्यात नगर परिषद निवडणुकीत भाजप विजयी झाला. शिवसेना शिंदे गटाचे पाच नगरसेवक निवडून आले. भाजपचे ११, एमआयएम एक, वंचित बहुजन एक तर काँग्रेस दोन वर थांबली. या एवढ्या मोठ्या घडामोडी मध्ये हिवरखेड शहरांमध्ये राजकीय वारसा असलेले श्यामशील भोपळे हे काँग्रेस पक्षाच्या तिकीटावर लढले व भाजपचे गावंडे समोर पराभूत झाले. मागील आठवड्यापासून श्यामशील भोपळे हे शिवसेना शिंदे गटाच्या संपर्कात होते अशी बातमी पसरली. अखेर रविवारी त्यांनी दबक्या पावलाने शिवसेना शिंदे गट मध्ये प्रवेश घेतला . आता हिवरखेड नगरपरिषद मध्ये स्वीकृत नगरसेवक मध्ये त्यांनी फॉर्म सुद्धा भरला आहे.

## प्रभाग १८ मध्ये शिवसेनेचे चारही उमेदवार दमदार

प्रतिनिधी १३ जानेवारी

**अकोला:** अकोला शहराच्या प्रभाग १८ मधील 'शिवसेना वसाहत' येथे शिवसेनेचा भगवा झेंडा बुलंद ठेवणारे शिवसेना जिल्हाप्रमुख अश्विन नवले आणि त्यांच्या पॅनेलच्या इतर उमेदवारांबाबत शिवसैनिकांसह मतदारांमध्ये मोठा उत्साह पाहायला मिळत आहे. हे चित्र पाहता, शिवसेनेचा बालेकिल्ला असलेली शिवसेना वसाहत अखेर शिवसेनेचीच राहणार असल्याचे स्पष्ट होत आहे.

प्रभाग क्रमांक १८ मध्ये शिवसेनेच्या 'धनुष्यबाण' या चिन्हावर शिवसेना जिल्हाप्रमुख अश्विन नवले, त्यांच्या पत्नी माजी नगरसेविका सौ. सपना नवले, युवा नेतृत्व बजरंग रोडे आणि सौ. अर्चना प्रदीप मुदिराज यांचे पॅनेल निवडणूक लढवत आहे. अश्विन नवले आणि सपना नवले यांना यापूर्वी नगरसेवक म्हणून कामाचा दांडगा अनुभव आहे. आता त्यांना बजरंग



रोडे आणि अर्चना मुदिराज यांसारख्या तरुण व उत्साही शिवसैनिकांची साथ मिळाल्याने, प्रभागाच्या विकासाबाबत मतदारांच्या अपेक्षा उंचावल्या आहेत. अकोला जिल्ह्यात शिवसेनेचा झेंडा बुलंद ठेवण्याचे काम एका कट्टर शिवसैनिकाच्या नात्याने अश्विन नवले यांनी केले आहे. या निवडणुकीत त्यांचा मुकाबला भाजप-राष्ट्रवादी युतीशी असला, तरी प्रचारादरम्यान शिवसेनेला मिळणारे जनसमर्थन आणि प्रेम वाखाणण्याजोगे आहे. जेव्हा सर्व शिवसैनिक हातात भगवा घेऊन प्रचारासाठी बाहेर पडतात, तेव्हा संपूर्ण प्रभागात एक वेगळेच वातावरण पाहायला मिळते. शिवसेना वसाहत, गंगानगर बायपास, सोमठाणा या परिसरात शिवसेना पॅनेलची लाट दिसून येत असून, त्यांच्या प्रचार सभा आणि रॅलींना मतदारांचा मोठा पाठिंबा मिळत आहे.

'आम्हाला मतदार बंधू-भगिनींची साथ आणि ज्येष्ठांचे आशीर्वाद हवे आहेत. तुमच्या सर्व समस्या सोडवण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत, फक्त तुमचा विश्वास हवा आहे,' असे आवाहन चारही उमेदवारांनी केले आहे.अश्विन नवले यांच्या नेतृत्वाखालीच प्रभागाचा १०० टक्के विकास होईल, अशी भावना मतदारांमध्ये आहे. हे सर्व पाहता, शिवसेनेच्या या पॅनेलच्या विजयाची पूर्ण शक्यता वर्तवण्यात येत आहे. अश्विन नवले यांनी सर्व मतदारांना 'धनुष्यबाण' या चिन्हासमोरील बटण दाबून चारही उमेदवारांना बहुमताने विजयी करण्याचे आवाहन केले आहे.

## प्रभाग १७ ब मध्ये सर्वात आश्वासक युवा चेहरा

प्रतिनिधी १३ जानेवारी

### अपक्ष उमेदवार शेख मो. राजीक यांचे कडवे आव्हान

**अकोला:** अकोला शहराच्या प्रभाग १७ ब मध्ये एकूण आठ उमेदवार आपले नशीब आजमावत आहेत. या सर्व उमेदवारांमध्ये युवा, उच्चशिक्षित आणि उद्योजक असलेले अपक्ष उमेदवार शेख मोहम्मद राजीक अब्दुल रऊफ यांना मतदारांची मोठी पसंती मिळत आहे. इतर उमेदवारांच्या तुलनेत त्यांची प्रतिमा अत्यंत वेगळी आणि स्वच्छ आहे. रविवारी रात्री जुने शहर भागातील भाजी बाजार परिसरात त्यांची निवडणूक सभा पार पडली, ज्यामध्ये शेकडो नागरिकांनी उपस्थित राहून त्यांचा उत्साह वाढवला.

अकोला शहराच्या प्रभाग १७ ब मध्ये भारतीय जनता पार्टी आणि एमआयएमच्या उमेदवारांना अपक्ष उमेदवार शेख मोहम्मद राजीक अब्दुल रऊफ तगडी फाईट देत आहेत. शेख मोहम्मद राजीक 'बॅट' अर्थात हिंदीत



बल्ला या चिन्हावर निवडणूक लढवत आहेत. त्यांचा स्वच्छ आणि तरुण चेहरा मतदारांना विशेष भावत आहे. राजीक हे राजकीय घराण्यातील असून त्यांचे वडील देखील नगरसेवक राहिले आहेत. त्यांनी बीएससी कॉम्प्युटर पर्यंत शिक्षण पूर्ण केले असून ते एक यशस्वी उद्योजक आहेत. तरुण आणि महिलांसाठी ते 'एनजीओ'च्या माध्यमातून सातत्याने समाजकार्य करत असतात. परिसरातील महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी त्यांनी ६०० महिलांना मोफत शिलाई मशीन चालवण्याचे प्रशिक्षण दिले आहे. तसेच कोविड काळात त्यांनी लोकांची मोठी मदत केली असून तरुणांसाठी ग्रंथालय देखील सुरू केले आहे.त्यांची ही लोकप्रियता पाहून जनतेनेच त्यांना निवडणुकीच्या रिंगणात उतरवले आहे. 'बॅट' हे चिन्ह घेऊन ते घरोघरी प्रचार करत असून, त्यांना मतदारांचा उत्स्फूर्त पाठिंबा मिळत आहे. त्यांच्या प्रचारात गुलाबी रंगाचे उपरणे घातलेले शेकडो कार्यकर्ते सहभागी होत आहेत. रविवारी रात्री जुने शहर येथील भाजी बाजार परिसरात त्यांच्या प्रचार सभेचे आयोजन करण्यात आले होते. सभेपूर्वी एक भव्य रॅली काढण्यात आली, ज्यामध्ये कार्यकर्त्यांपेक्षा सर्वसामान्य मतदारांची संख्या लक्षणीय होती. या सभेला 'मायनॉरिटी राईट्स फेडरेशन महाराष्ट्र'चे कार्याध्यक्ष रागिब अहमद यांनी संबोधित केले. त्यांनी उपस्थित मतदारांना शेख मोहम्मद राजीक यांच्यासारख्या सुशिक्षित उमेदवाराला 'बॅट' चिन्हाचे बटण दाबून प्रचंड बहुमताने विजयी करण्याचे आवाहन केले. सभेला उमेदवार मोहम्मद राजीक यांच्यासह साजिद सर, इन्नू पैलवान, हाजी समीर, शेरू पैलवान, युसूफ पैलवान, झाकीर पैलवान, रियाज खान, अमानुल्लाह खान, एहतेशाम हुसैन, राजू काजी, राशीद पैलवान, महबूब पैलवान, रशीद भाई आदी मान्यवर उपस्थित होते.

## शिवसेनेचे सागर भारुका यांना मतदारांचा वाढता पाठिंबा कायम

प्रतिनिधी १३ जानेवारी

### भाजप या प्रभागात बॅकफूटवर गेल्याचे चित्र आले आहे समोर

**अकोला:** अकोला महानगरपालिका निवडणुकीत यावेळी अनेक प्रभागांमध्ये दोन उमेदवारांत थेट, तर काही ठिकाणी तिरंगी किंवा बहुकोणीय मुकाबला पाहायला मिळत आहे. विशेषतः प्रभाग क्रमांक १२ 'ड' मध्ये दोन उमेदवारांमध्ये काट्याची टक्कर होत असून, यात शिवसेना ठाकरे गटाचे आक्रमक नेते सागर भारुका यांचे पारडे सध्या जड दिसत आहे.



जसजसा मतदानाचा दिवस जवळ येत आहे, तसतसा प्रचाराचा वेग प्रचंड वाढला आहे. आरोप-प्रत्यारोपांच्या फैरी झाडल्या जात असून सर्वच उमेदवार जीव तोडून प्रचार करत आहेत. अशातच संपूर्ण शहराचे लक्ष लागून राहिलेला प्रभाग म्हणजे 'प्रभाग १२'. येथे भारतीय जनता पक्षासमोर शिवसेनेचे दमदार युवा व आक्रमक नेते सागर भारुका यांनी तगडे आव्हान उभे केले आहे. प्रभागात ज्या ज्या ठिकाणी सागर भारुका प्रचारासाठी जात आहेत, तिथे त्यांना मतदारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.

पहिल्यांदाच सागर भारुका आपल्या 'होम पिच'वर निवडणूक लढवत असल्याने त्यांना मतदारांकडून मोठी सहानुभूती आणि प्रेम मिळत आहे. रविवारी रात्री प्रभागातील अनिकट परिसरात त्यांची प्रचार सभा पार पडली. या सभेला पोहोचण्यापूर्वी परिसरातील नागरिकांनी फटाक्यांची जोरदार आतषबाजी करत त्यांचे जंगी स्वागत केले. मतदारांचे हे अभूतपूर्व प्रेम पाहून सागर भारुका भावूक झाले होते. आपल्या भाषणात ते म्हणाले की, 'ही निवडणूक आपल्या सर्वांसाठी अत्यंत महत्त्वाची आहे.

## डम्पिंग ग्राऊंडचा प्रश्न मार्गी लावणार - आमदार साजिद खान पठाण

प्रतिनिधी १३ जानेवारी

### प्रभाग १ च्या विकास कामांची जबाबदारी घेतली काँग्रेसने

**अकोला:** अनेक वर्षांपासून प्रभाग १ मधील नायगाव परिसरात डम्पिंग ग्राऊंडची मोठी समस्या आहे. निवडणूक जिंकल्यानंतर सर्वात आधी प्रभाग १ मधून हे डम्पिंग ग्राऊंड हलवले जाईल. त्या जागेवर खेळाचे मैदान, उद्यान आणि ओपन जिम तयार करण्याचे काम केले जाईल. याशिवाय, रेल्वे लाईनखालील पुलाच्या समस्येचेही लवकरच निराकरण करण्यात येईल. जर प्रभाग १ चा विकास करायचा असेल, तर काँग्रेसच्या सुशिक्षित उमेदवार निलोफर खान सोहेल खान, अब्दुल सलाम अब्दुल करीम खान, शेख अब्दुल्ला शेख सलीम आणि अजरा नसरीन मकसूद खान यांना विजयी करून महानगरपालिकेत पाठवणे आवश्यक



आहे, असे प्रतिपादन अकोट फैल येथे आयोजित सभेत आमदार साजिद खान पठाण यांनी केले.

या प्रसंगी बबलू ठेकेदार, राजा ठेकेदार, बाबा ठेकेदार, सय्यद सज्जू, सय्यद समीर, अयुब खान, नाझीम चौधरी, मुश्ताक शाह, इस्माईल, याकूब, तौफीक आदी उपस्थित होते. आमदार पठाण पुढे म्हणाले की, प्रभाग १ चे पॅनेल हे मनपाच्या सर्व प्रभागांमधील काँग्रेसचे सर्वात मजबूत पॅनेल आहे.यावेळी निलोफर सोहेल खान यांनी सांगितले की, 'मला नायगावचा विकास करायचा आहे. मी स्वतः आर्किटेक्ट असल्याने इथला विकास कसा करायचा हे मला माहित आहे. माझे पती सोहेल खान हे देखील आर्किटेक्ट आहेत, त्यामुळे या प्रभागाला दोन आर्किटेक्ट मिळतील. प्रभाग १ मध्ये तारफैलकडून येणारा नाला डायव्हर्ट करणे, शादी हॉल उभारणे, विद्यार्थ्यांसाठी लायब्ररी, रस्त्यांचे काँक्रीटीकरण, रस्त्याच्या कडेला झाडे, पथदिव्यांची समस्या सोडवणे, तसेच ईदगाह आणि कब्रस्तानचा विकास करणे हेच आमचे उद्दिष्ट आहे.'तर अब्दुल सलाम यांनी सांगितले की, पूरग्रस्त कॉलनी, नायगाव, १६०० प्लॉट, भारत नगर यांसह प्रभाग १ मधील सर्व क्षेत्रांचा विकास करणे हाच आमचा संकल्प आहे. शेख अब्दुल्ला यांनी प्रधानमंत्री आवास योजनेचा लाभ मिळवून देणे, परिसरात रुग्णवाहिका सेवा सुरू करणे, बेरोजगार तरुणांसाठी रोजगार मेळावे आयोजित करून नोकरीच्या संधी उपलब्ध करून देणे आणि नियमित पाणीपुरवठा करण्यास प्राधान्य देणार असल्याचे सांगितले. अजरा नसरीन यांनी सांगितले की, प्रभागातील दिव्यांग, विधवा आणि वृद्ध नागरिकांना सरकारी योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी सर्वतोपरी मदत केली जाईल, तसेच परिसरातील नाल्यांचे काँक्रीटीकरण करण्याचा संकल्प आम्ही केला आहे.

## नेहा गुजर यांच्या विजयासाठी मतदार आग्रही

प्रतिनिधी १३ जानेवारी

**अकोला:** महापालिका निवडणुकीत कृतीशील वचननाम्यातून मतदारांना आकर्षित करणारे उमेदवार दिसत आहेत. प्रभाग १७ च्या अपक्ष उमेदवार नेहा अमोल गुजर यांची वैशिष्ट्यपूर्ण प्रचार शैली मतदारांना भावत आहे. प्रभागातील लोकांसाठी धावून जाणारे अमोल गुजर यांच्या धडाडीचा फायदा नेहा गुजर यांना होईल असा विश्वास या प्रभागातील मतदार बोलून दाखवत आहेत

महानगरपालिकेचे अंतर्गत संगणक प्रशिक्षण मोफत करणे, रामभरोसे व्यायाम शाळांमध्ये स्विमिंगपूल, वाकींग ट्रक, बगीचा निर्मिती, प्रभाग १७ मधील घराची लेआउट पट्टे करून देणे, ग्रंथालय निर्मिती, आरोग्य केंद्र वाढवणे,



सायंकाळी एक तास वायफाय (इंटरनेट) ची मोफत सुविधा, महानगरपालिका शाळेत इंग्रजी शिक्षणावर भर देणे, मुलांना खेळण्यासाठी मैदान, महिलांसाठी सामाजिक उपक्रम राबवणे, वृद्धाकरिता आरोग्य शिबीर तसेच वाचनालयाची निर्मिती, रस्ते, नाल्यांची स्वछता ठेवणे आदींचा वचननामा नेहा गुजर यांनी जाहीर केला आहे. ऑटोरिक्षा समोरील बटन दाबून विजयी करा असे आवाहन केले आहे.

## भाजपचा प्रभाग पंधरा मध्ये जोरदार प्रचार, सर्वांना जनतेची साथ

### हरिश आलिमचंदानी, मनिषा भंसाली, अरविंद टाले यांचा प्रचार वेगात

प्रतिनिधी १३ जानेवारी

**अकोला:** अकोला महानगरपालिका निवडणुकीचा ज्वर चढू लागला असून, भाजप चे अधिकृत उमेदवार हरीश अलीमचंदानी यांनी प्रचारात प्रचंड आघाडी घेतली आहे. गेल्या तीन दिवसांपासून सुरू असलेल्या त्यांच्या झंझावाती पदयात्रांमुळे प्रभागात प्रभाव अधिकच वाढला असून, नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद त्यांना मिळत आहे.

भाजप उमेदवारांना नागरिकांकडून त्यांना उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. निवडणुकीच्या रणधुमाळीत भाजपचे ज्येष्ठ नेते हरीश आलिमचंदानी, मनीषा भंसाली, बाळ टाले यांनी प्रभाग क्रमांक १५ मधील कोपरा कोपरा पिंजून काढला



आहे. किर्ती नगर परिसरातून मोठा जनसमुदाय सोबत घेऊन त्यांनी सिद्धिविनायक कॉलनी, होम हाऊसिंग सोसायटी येथे जोरदार शक्तीप्रदर्शन केलं. या सातत्यपूर्ण संपर्कामुळे विरोधकांची हवा गुल झाली आहे. प्रत्येक कॉलनीतील ज्येष्ठ नागरिकांनी तसेच काँग्रेस नगर मधील तरुण वर्गाने त्यांचे जंगी स्वागत करत त्यांना आपला संपूर्ण पाठिंबा दर्शवला. यावेळी हरिश आलिमचंदानी यांनी डमी ईवीएम मशीन द्वारे मतदान कसे करावे याचे प्रात्यक्षिकही नागरिकांना दाखवले. या प्रचार सभेत वैशाली विवेक देवकते भाजपा ओबीसी महिला आघाडी अध्यक्षा, उमंग जोशी, विवेक देवकते, प्रमोद तट्टे, गणपत शेगोकर, श्याम ठाकूर, हिरालाल कृपलानी, विनोद मनवानी, अनूप शर्मा, रणजीत खेड़ेकर, रवीन्द्र भंसाली, स्वानंद कोंधलेकर, रमेश अलीमचंदानी, प्रकाश अलीमचंदानी, मणिभाई जसमतिया, शेखर शेलके, अजय बोधानी, सुशील राजपाल, गिरिधर पोपटानी, सुधीर बेलानी, उदय जोशी, दीपक मनवानी, बबलू धनवानी, सोनू जसूजा, मनीष बुंदेले, हरीश अमानकर पाटिल, श्रीकांत गवांडे, ऋषिकेश महले, शुभम् महले, स्वप्निल भगत, प्रज्वल काकड़, सन्नी शंके, गजानन दूबे, मयूर शिंदे आदिंचा सहभाग होता.

## 'मशाल' पेटवून प्रभाग १३ चा कायापालट करणार

### शिवसेनेने अनुभवी आणि अभ्यासू चेहऱ्यांची निवड केली

प्रतिनिधी १३ जानेवारी

**अकोला:** महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूकीत प्रभाग क्रमांक १३ हा अत्यंत महत्वाचा प्रभाग आहे. प्रभाग क्रमांक १३ मध्ये शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने जोरदार मुसंडी मारली आहे. पक्षाचे अधिकृत उमेदवार देवराव सोनाजी अहीर, सौ. दामिनी अक्षय नागापुरे, ॲड. दिपाली रमन जानोरकर आणि गोपाल परमेश्वर बिल्लेवार यांनी आपला जाहीरनामा प्रसिद्ध करत मतदारांशी संवाद साधला आहे.

प्रभाग तेराच्या विकास कामांसाठी विकासाचे १० कलमी आश्वासन शिवसेनेच्या उमेदवारांनी दिले आहे. शिवसेनेने आपल्या प्रचारात स्थानिक समस्यांना केंद्रस्थानी ठेवले असून खालील



प्रमुख आश्वासने दिली आहेत. यात कृषि नगर रहिवाशांचे प्रश्नावर फोकस केला आहे. या परिसरातील जागा नावावर करून घरकुल मिळवून देण्याचे वचन शिवसेना उमेदवाराने दिले आहे. शिवर ते बस स्टँड या मार्गावर नियमित 'सिटी बस' सेवा सुरू करणार असे ठोस आश्वासन दिले आहे. मनपा शाळांचा दर्जा सुधारणे, प्रभागात रुग्णवाहिका आणि वैकुंठरथ (शव पेटी) उपलब्ध करून देणे, जन्म-मृत्यू दाखले, रेशन कार्ड यांसारखी कागदपत्रे स्थानिक स्तरावर उपलब्ध करून देणे, निराधार, अपंग आणि विधवांच्या मानधनात नियमितता आणण्यासाठी प्रयत्न आदी आश्वासन दिले आहे. या प्रभागातून शिवसेनेने अनुभवी आणि अभ्यासू चेहऱ्यांची निवड केली आहे. यामध्ये देवराव अहीर यांच्या रूपाने अनुभवी नेतृत्व, तर ॲड. दिपाली जानोरकर यांच्या रूपाने कायदेशीर जाण असलेले उमेदवार रिंगणात आहेत.

महिलांच्या समस्यांसाठी सौ. दामिनी नागापुरे आणि युवकांसाठी गोपाल बिल्लेवार सक्रिय राहणार आहेत. 'प्रभागातील प्रत्येक नागरिकाला मूलभूत सुविधा मिळवून देण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत असे उमेदवारांनी स्पष्ट केले आहे. मतदारांनी 'मशाल' या चिन्हासमोरील बटण दाबून आम्हाला भरघोस मतांनी विजयी करावे,' असे आवाहन उमेदवारांच्या वतीने करण्यात आले आहे.

## प्रभाग १६ मध्ये डॉ. मुस्कान पंजवानींसह भाजप उमेदवार विजयाकडे अग्रेसर!

### माजी नगरसेवक सुजीत ठाकूर यांच्या रणनीतीमुळे विरोधकांचे धाबे दणाणले


प्रतिनिधी १३ जानेवारी

**अकोला:** अकोला महानगरपालिका निवडणुकीचा ज्वर चढला असून, प्रभाग क्रमांक १६ मध्ये भारतीय जनता पार्टीने आपली पूर्ण ताकद झोकून दिली आहे. भाजपच्या अधिकृत उमेदवार डॉ. मुस्कान पंजवानी यांनी प्रभागात राबविलेल्या जनसंपर्क मोहिमेला मतदारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून, डॉ. मुस्कान यांच्यासह भाजपचे इतर उमेदवारही विजयाकडे वेगाने कूच करत असल्याचे चित्र सध्या दिसत आहे. उच्च विद्याविभुषित व डॉक्टर असलेल्या मुस्कान पंजवानी यांच्यासह भाजपचे पॅनल प्रभाग सोळा मध्ये विजयाकडे आगेकूच करत आहे. या निवडणुकीत प्रभाग १६ चे माजी नगरसेवक सुजीत ठाकूर यांची भूमिका अत्यंत निर्णायक ठरत आहे. डॉ. मुस्कान पंजवानी यांना त्यांनी जाहीर पाठिंबा देत आपल्या अनुभवाची आणि कार्यकर्त्यांच्या फौजेची जोड दिली आहे. सुजीत ठाकूर यांनी स्वतः प्रचाराची धुरा सांभाळल्याने मतदारांमध्ये विश्वासाचे वातावरण निर्माण झाले आहे. 'केवळ आणि केवळ विकास' हाच आमचा अजेंडा असून, प्रभागातील प्रलंबित प्रश्न मार्गी लावण्यासाठी डॉ. मुस्कान यांच्यासारख्या सुशिक्षित आणि कार्यक्षम उमेदवाराची गरज असल्याचे ठाकूर यांनी ठामपणे सांगितले. डॉ. मुस्कान पंजवानी यांच्या विजयासाठी संजय बाबूलाल बडोणे आणि सिद्धार्थ उपरवट हे दोन प्रमुख आधारस्तंभ रात्रंदिवस मेहनत घेत आहेत. त्यांच्या नियोजनामुळे भाजपची प्रचार यंत्रणा प्रभागातील घराघरापर्यंत पोहोचली आहे. 'प्रभाग १६ मध्ये विकासाची नवी पहाट' आणण्याचा संकल्प घेऊन निघालेल्या या टीमला नागरिकांचा मोठा कौल मिळताना दिसत आहे.


## निष्ठावंत सुनील उंबरकर यांच्या अपक्ष उमेदवारीला जनसामान्यांचा उदंड प्रतिसाद

प्रतिनिधी १३ जानेवारी

**अकोला:** प्रभाग क्रमांक ८ च्या राजकारणात आता मोठी उलथापालथ पाहायला मिळत आहे. भाजपचे खंदे आणि निष्ठावंत कार्यकर्ते सुनील शिवराम उंबरकर यांनी अपक्ष शड्डू ठोकल्याने निवडणुकीत रंगत आली असून, त्यांना मतदारांचा वाढता पाठिंबा मिळत असल्याने प्रस्थापित उमेदवारांचे धाबे दणाणले आहेत.



डाबकी रोड प्रभाग क्रमांक ८ ड मधील भाजपचे अतिशय सक्रीय आणि बुथ स्तरापासून महानगर स्तरापर्यंत संघटना बांधणीत मोलाचे योगदान देणारे सुनील शिवराम उंबरकर यांना पक्षाने उमेदवारी नाकारली. कार्यकर्त्यांनी आणि स्थानिक नागरिकांनी त्यांच्या नावाचा आग्रह धरूनही वरिष्ठांनी त्याकडे दुर्लक्ष केले. मात्र, 'जनतेचा कौल हाच माझा आदेश' मानत, उंबरकर यांनी आता प्रभाग ८ च्या विकासासाठी अपक्ष म्हणून कंबर कसली आहे. 'पक्षाने डावलले असले तरी, जनतेने मला स्वीकारले आहे,' असा ठाम विश्वास त्यांनी व्यक्त केला आहे.'नारळाची बाग' चिन्हावर विकासाचा नवा संकल्प सुनील उंबरकर यांनी केला आहे. सुनील उंबरकर म्हणजे एक हसतमुख व्यक्तिमत्व आणि विकासकामांचा दांडगा अनुभव असलेला चेहरा. डाबकी रोड प्रभाग ८ च्या समस्यांची त्यांना खडान् खडा माहिती आहे. रखडलेली कामे मार्गी लावणे आणि प्रभागाचा कायापालट करणे ही त्यांची प्रमुख उद्दिष्टे आहेत.



सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड
मंगळवार, दि. १३ जानेवारी २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

# एकला चलो रे चा शिवसेना शिंदे गटाचा प्रयोग होणार का यशस्वी ?

## दोन्ही शिवसेना चे शहरात होणार पानिपत

प्रतिनिधी १३ जानेवारी

**अकोला :** महाराष्ट्र सरकार मध्ये भाजपा राष्ट्रवादी आणि शिवसेना शिंदे गटाची युती असली तरी महानगरपालिका निवडणुकीत मात्र जागा वाटपावरून युती फिस्कटल्याने शिवसेना शिंदे गटाने एकला चलो रे ची भूमिका घेत स्वबळावर निवडणूक लढवण्याची भूमिका घेतली आहे काही दिवसांपूर्वी नगरपालिका व नगरपंचायत निवडणुकांमध्ये शिंदे गटाला राज्यात बऱ्यापैकी यश मिळाल्याच्या पार्श्वभूमीवर यावेळी देखील महापालिका निवडणूक स्वबळावर लढण्याचा निर्णय घेण्यात आला मात्र या निर्णयाची अंमलबजावणी करताना झालेल्या तिकीट वाटपामुळे पक्षांतर्गत नाराजी उफाळून आल्याचे अनेक प्रभागातील चित्र आहे बर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना नाराजांची जाहीररीत्या समजूत घालावी लागली होती राजकीय विश्लेषकांच्या मते महापालिका निवडणूक ही केवळ विचारांची नव्हे तर संघटनात्मक शिस्त, बूथ व्यवस्थापन आणि कार्यकर्त्यांच्या एकनिष्ठ मेहनतीची परीक्षा असते परंतु शिवसेनेच्या फुटी नंतर शिंदे सेनेत आलेल्या अनेक कार्यकर्त्यांना तिकीट न मिळाल्याने ते नाराज आहेत ज्यांनी शिंदे सेनेच्या स्थापनेपासून पक्षाचे कार्य करण्यास सुरुवात केली अशांना तिकीट डावलून नव्याने अन्य पक्षातून किंवा ठाकरे गटातून आलेल्या उमेदवारांना तिकीट दिल्याने शिंदे गटातील निष्ठावंत नाराज झाले आहेत त्यांची नाराजी उमेदवारांच्या प्रचारात दिसून येत आहे हे नाराजी थेट मतदारापर्यंत पोहोचते आणि तीच निवडणुकीत निर्णायक ठरू शकते एकतर शिंदे गटात दोन दोन तीन तीन जिल्हाप्रमुख महानगर प्रमुख असल्याने कार्यकर्त्यांचे सुद्धा विभाजन होत आहे शिवसेना शिंदे गटाच्या अनेक नेत्यांनी आपल्या परिवारातील सदस्यांनाच उमेदवारी दिल्याने निष्ठावंत शिवसैनिक नाराज झाले आहेत हे नाराज कॅडर या निवडणुकीत निष्क्रिय राहिल्याने मतांचे विभाजन होणे नक्की आहे त्यामुळे शिवसेना शिंदे गटाच्या प्रचाराची धार बोथट झाली आहे त्यामुळे अकोला महापालिका निवडणुक प्रचारात शिंदे सेनेला अपेक्षित आघाडी घेता आलेली नाही भाजपा व राष्ट्रवादी यांच्यासोबत महायुतीला झाल्याने उमेदवार निश्चितीच्या शेवटच्या क्षणापर्यंत पक्षात संभ्रमाचे वातावरण होते त्यामुळे या निवडणुकीत शिवसेना शिंदे गटाला दुहेरी आकडा गाठता येणार की नाही हा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे त्याचबरोबर शिवसेनेची शक्ती विभाजीत झाल्याने काही नगरसेवक उद्धवसेनेची साथ सोडून शिंदे गटात प्रवेश करीत निवडणूक लढवीत आहेत त्यामुळे या उमेदवारांबद्दल सुद्धा मतदारांमध्ये नाराजी असून गद्दारीचे फळ त्यांना भोगावेच लागणार आहे प्रचारातील विस्कळीतपणा नेत्यांचे दुर्लक्ष आणि अंतर्गत गटबाजी या दोन्ही शिवसेनेच्या अधोगतीला कारणीभूत ठरत आहेत शिवसेना नेत्याने शहरात सभा घेतली नाही केवळ आमदार नितीन देशमुख यांच्या सभा झाल्या आहेत परंतु उद्धव ठाकरे आदित्य ठाकरे अरविंद सावंत आधी मोठे नेते मुंबई निवडणुकीत व्यस्त असल्याने त्यांचे एकही सभा न झाल्याने त्याचा फटका सुद्धा शिवसेना ठाकरे गटाला बसणार आहे त्यामुळे या महापालिका निवडणुकीत दोन्ही शिवसेनेचे पानिपत होण्याची संभावना व्यक्त केली जात आहे शहरात दुसरीकडे भारतीय जनता पार्टीची संघटनात्मक शिस्त बूथ व्यवस्थापन आणि कार्यकर्त्यांच्या एकनिष्ठ मेहनतीला पाहता यंदा सुद्धा भाजपा महापालिकेत सत्ता स्थापन करणार असा अंदाज वर्तविला जात आहे

# शहरातील सर्वच उमेदवारांचा प्रचार महिलांच्या भरोशावर



प्रतिनिधी १३ जानेवारी

**अकोला :** महापालिका निवडणूक प्रचाराचा आज अंतिम दिन आहे प्रचार सुरू झाल्यापासून ते आज शेवटच्या दिनापर्यंत शहरातील सर्वच उमेदवारांनी महिलांच्या भरोशावर प्रचार केल्याचे दिसून येत आहे. महापालिका निवडणुकीच्या

रणधुमाळीत उमेदवारांच्या प्रचाराचा कणा महिला कार्यकर्त्या ठरल्या आहेत. दोन पुरुष प्रचारकांपेक्षा दहा महिला प्रचारक अधिक परिणामकारक ठरत असल्याची भावना उमेदवारांकडून व्यक्त केली जात आहे. सकाळपासूनच महिला प्रचारक उमेदवारांच्या रॅलीत वेळेवर पोहोचल्याचे दिसून आले. उमेदवारांसोबत प्रचाराचा पहिला टप्पा पूर्ण होईपर्यंत त्या चिकाटीने काम करतात.

घरोघरी पत्रक वाटप करणे, घरोघरी मतदानाच्या चिठ्ठ्या पोहोचवणे, तसेच रात्री होणाऱ्या मोहल्ला सभांमध्येही महिला कार्यकर्त्यांची उपस्थिती लक्षणीय असते. साध्या पोह्यांवर किंवा साध्या अल्पोपहारावरही समाधान मानत त्या प्रामाणिकपणे प्रचार करतात. इमानदारी आणि सचोटीने काम करण्याची त्यांची पद्धत उमेदवारांसाठी दिलासादायक ठरत आहे. खर्चाच्या बाबतीतही प्रचारक महिला उमेदवारांसाठी फायदेशीर ठरताहेत. पुरुष प्रचारकांप्रमाणे सकाळच्या नास्त्यापासून रात्रीच्या जेवणापर्यंत कोणताही आग्रह महिलांकडून केला जात नाही. त्यामुळे प्रचाराचा खर्चही तुलनेने कमी राहतो. मिळेल त्या पैशावर महिलांनी प्रचार केला. उलट पुरुष प्रचारक घेतल्यास त्यांच्या खाण्यापिण्याची आणि इतर सोयींची व्यवस्था करावी लागते, ज्यामुळे उमेदवारांवर अतिरिक्त आर्थिक बोजा पडतो.



सर्वच पक्षांच्या रॅली आणि प्रचारामध्ये महिलांची संख्या लक्षणीय दिसून येत आहे. महापालिका निवडणुकीत महिलांना ५० टक्के आरक्षण दिले असले तरी प्रचारात महिलांचे प्रमाण तब्बल ९० टक्क्यांपर्यंत आहे. आज महापालिकेचा संपूर्ण प्रचार महिलांच्या भरोशावर सुरू असल्याचे स्पष्टपण् दिसून आले आहे.

# भाजप राष्ट्रवादी युती विजयाचा गुलाल उधळणार

प्रतिनिधी १३ जानेवारी

**अकोला :** भारतीय जनता पक्ष आणि राष्ट्रवादी अजित पवार गट महापालिका निवडणुकीला आत्मविश्वासाने सामोरे जाताना दिसत आहे. त्यांच्या तुलनेत विरोधी पक्षांची रणनीती विस्कळीत झालेली दिसते. त्यामुळे विजयाचा गुलाल भाजप राष्ट्रवादी युती उधळणार असे संकेत आहेत.

भारतीय जनता पक्ष ६२ जागी, १४ ठिकाणी राष्ट्रवादी अजित पवार गट तर चार जागी मैत्रीपूर्ण लढती होणार आहे. महापालिकेच्या माध्यमातून विजय रथ वेगाने पुढे नेण्यासाठी भाजप राष्ट्रवादीला विजयी करण्याचे आवाहन करण्यात येत आहे. इतकेच नाही तर आवाहनाला जनतेतून चांगला प्रतिसाद मिळत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची अकोला क्रिकेट मैदानावर जंगी सभा झाली. तसेच महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी वेळोवेळी आढावा बैठकी, प्रचार सभा घेतल्या. आमदार रणधीर सावरकर यांनी यावेळी ६० जागा निवडून आणण्याचा निर्धार करून संपूर्ण शहर पिंजून काढले. खासदार अनुप धोत्रे, जिल्ह्याचे पालकमंत्री आकाश फुंडकर, राष्ट्रवादी काँग्रेसचे महानगर अध्यक्ष विजयभाऊ देशमुख, विजय अग्रवाल, जिल्हाध्यक्ष संतोष शिवरकर, महानगर अध्यक्ष जयंत मसने, सुहासिनीताई धोत्रे, मंजुषा सावरकर, सुमनताई गावंडे, गीतांजली शेगोकार, अपूर्वा कुळकर्णी, अर्चना शर्मा, चंदा शर्मा यांच्यासह भारतीय जनता पक्ष आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे हजारो कार्यकर्ते प्रचाराला लागले. प्रत्येक मतदारां पर्यंत पोहचवण्याचा ध्यास दिसला. प्रचार सभांना ठिकठिकाणी अतिशय चांगला प्रतिसाद मिळाला. यामुळे भाजप आणि राष्ट्रवादी अजित पवार गट युतीसाठी पोषक वातावरण तयार झाले.

केंद्र आणि राज्य शासनाच्या माध्यमातून विविध योजना राबविल्या जात आहेत. त्या योजनांचा लाभ शहरवासीयांना व्हावा म्हणून भाजप राष्ट्रवादी युती विजयी होणे काळाची गरज आहे. हे आवाहन मतदारांना भावलेले दिसते. त्यामुळे शहर विकासाचे स्वप्न पूर्ण होईल असा विश्वास देखील व्यक्त केला जातो आहे. युतीच्या गोटात सकारात्मक वातावरण दिसते.

# हर्ष चौधरी २२ व्या वर्षी निवडणुकीच्या रिंगणात

## ◆ प्रभाग ९ ड मध्ये भारतीय जनता पक्षाचे उमेदवार

प्रतिनिधी १३ जानेवारी

**अकोला:** महापालिका निवडणुकीत नवीन चेह-यांना राजकीय पक्षांनी उमेदवारी दिलेली दिसते आहे. आणि प्रभाग क्रमांक ९ मध्ये हर्ष बाबुराव चौधरी भारतीय जनता पक्ष राष्ट्रवादी अजित पवार गटाचे उमेदवार म्हणून निवडणूक लढवित आहेत. अवघ्या बाविसाव्या वर्षी पक्षाने त्यांच्यावर विश्वास टाकला आहे.



भीमनगर, गुलजारपुरा आणि परसराने व्यापलेला हा प्रभाग आहे. विरोधी पक्षाच्या मुरब्बी राजकारण्यांशी लढत असली तरी आपण तुल्यबळ लढत देऊ असा विश्वास हर्ष चौधरी यांनी व्यक्त केला. आमदार रणधीर सावरकर यांनी हर्ष चौधरी यांच्यासाठी पदयात्रा काढली. पदयात्रेला चांगला प्रतिसाद मिळाला. भारतीय जनता पक्ष आणि राष्ट्रवादी अजित पवार पक्षाचे कार्यकर्ते तसेच या भागातील सर्वच स्तरातील मतदार हर्ष चौधरीला पाठिंबा देताना दिसत आहे. हर्ष चौधरीने या प्रभागात चांगले वातावरण तयार केले आहे. मतदारांशी प्रामाणिक राहण्याचे अभिवचन हा युवा उमेदवार देत आहे.

# शिवसेनेच्या प्रचार सभेला मातृशक्तीचा सहभाग

## हरिहर पेठ, भीम नगर भागात मातृशक्तीचा राजेश मिश्रांना आशिर्वाद



प्रतिनिधी १३ जानेवारी

**अकोला:** महापालिका रणधुमाळीत प्रभाग क्र. १७ मध्ये राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. कटटर शिवसैनिक राजेश मिश्रा यांच्या नेतृत्वाखाली कॉर्नर सभांनी वातावरण टाईट झाले आहे. प्रभाग १७ मध्ये अनेक उमेदवार हे मतदारांना नको त्या गोष्टी पाजून त्यांचे आयुष्य बरबाद करत आहे. पण, राजेश मिश्रा यांनी मतदारांना दूध पाजण्याचा संकल्प केला.

मातृशक्तीचा आशिर्वाद प्रभागातील शिवसेनेच्या चार ही उमेदवाराला पाठिंबा असल्याचे चित्र आहे. शिवसेना पुन्हा प्रभाग १७ मध्ये भगवा झेंडा फडविण्याची तयारी करत आहे. राजेश मिश्रा हे कट्टर शिवसैनिक असून ते लोकप्रिय नेते ठरले आहे. राजेश मिश्रा यांच्यासह प्रभाग १७ मधील पॅनेलचे इतर उमेदवार सौ. सविता गजानन चव्हाण, सौ. अंकिता चेतन गुजर आणि सौ. गीता रमाशंकर मिश्रा यांनीही या सभेत उपस्थित होत्या.

राजेश मिश्रा यांनी गेल्या काही वर्षांत प्रभागात केलेल्या विकासकामांची पावती प्रत्येक छोटेखानी सभेत दिसून येते. महिलांचा व पुरुषांचा मोठा पाठिंबा राजेश मिश्रा यांच्या पॅनल मागे आहे. एकीकडे दूसरे उमेदवार मतदारांचे आयुष्य उध्दवस्त करत असताना मतदारांना दुध पिण्याची सोय राजेश मिश्रा यांच्या प्रचार सभेत त्यांच्या समर्थकांनी केली आहे. या उपक्रमाचा स्थानिक महिलांनी उत्स्फुर्त प्रतिसाद देत राजेश मिश्रा यांचे कौतुक केले आहे. मतदारांना नको ते प्रलोभन विरोधक दाखवित असताना राजेश मिश्रा यांच्या समर्थकांनी सुरु केलेला हा उपक्रम गोवंश रक्षक व प्रेमींसाठी आनंद निर्माण करणारा ठरला आहे.

# भारतीय जनता पक्ष, राष्ट्रवादी युतीला विजयी करा

प्रतिनिधी १३ जानेवारी

**अकोला :** भारतीय जनता पक्षाच्या वतीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, पालकमंत्री आकाश फुंडकर, प्रदेश सरचिटणीस आमदार रणधीर सावरकर, खासदार अनुप धोत्रे, आमदार प्रकाश भारसाकळे, आमदार हरीश पिंपळे, आमदार वसंत खंडेलवाल, इंदूरचे खासदार शंकरलाल लालवानी, भाजपा जिल्हाध्यक्ष संतोष शिवरकर, जयंत मसने, विजय अग्रवाल, तेजराव थोरात, किशोर पाटील, कृष्णा शर्मा यांनी केले आहे.

एडवोकेट सुभाषसिंग ठाकूर, डॉ. किशोर मालोकार, जयश्री पुंडकर, वैशालीताई शेळके, सुहासिनीताई धोत्रे, मंजुषाताई सावरकर, पुष्पाताई खंडेलवाल, अर्चनाताई शर्मा, विजयसिंह सोळंके, अमरसिंग भोसले, उमेश पवार, हिवरखेडच्या नगराध्यक्ष सुलभाताई दुतोंडे, अकोटच्या नगराध्यक्ष मायाताई धुळे, तेल्हारा नगराध्यक्ष वैशालीताई पालीवाल, मूर्तिजापूरचे नगराध्यक्ष हर्षद साबळे , गटनेते रवी ठाकूर, अतुल विखे, रमेश दुतोंडे, चंद्रकांत अंधारे, अंबादास उमाळे, राजेश नागमते, राजेश बेले, शंकरराव वाकोडे, कृष्णा चव्हाण, चंदाताई शर्मा, शितल रूपा रेल, वसंत बाचू का अशोक गुप्ता, निकेश गुप्ता, रमेशचंद्र चांडक, सुधीर रादड, रमण जैन ,डॉ.अभय जैन, गणेश लोड, किशोर कुचके, भिकाजी धोत्रे आदी कार्यकर्त्यांनी देखील जनसंपर्क भाजपा राष्ट्रवादी काँग्रेस युतीला विजयी करण्याचे आवाहन केले.

# 'ते' भाजपचे सक्रिय सदस्य नाहीत : शिवरकर

प्रतिनिधी १३ जानेवारी

**अकोला :** रामचंद्र बरेठिया, जितेंद्र बरेठिया यांचा भारतीय जनता पक्षाशी संबंध नाही. ते भारतीय जनता पक्षाचे सदस्य नाही. सक्रिय सभासद नाही अशी माहिती भाजपा जिल्हाध्यक्ष संतोष शिवरकर यांनी दिली.

कोणता पक्ष कोणाला स्वीकृत सदस्यासाठी नाव देतो हा त्यांचा अधिकार आहे भारतीय जनता पक्षाचा त्यांच्याशी काही संबंध नाही. भारतीय जनता पक्षाच्या कोणत्याही कार्यक्रमांमध्ये ते सहभागी होत नाही. भारतीय जनता पक्षाशी त्यांचे नाता जोडण्याचा प्रयत्न करू नये अशी विनंती जिल्हा भाजपा अध्यक्ष संतोष शिवरकर यांनी केली आहे.

# महापालिका निवडणूक, मतदानाची जय्यत तयारी



प्रतिनिधी १३ जानेवारी

**अकोला :** अकोला महापालिका निवडणुकीचे मतदान गुरूवार, १५ जानेवारी रोजी होणार आहे. यासाठी महापालिका आयुक्त तथा निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. सुनील मापारी यांच्या मार्गदर्शनाखाली यंत्रणा सज्ज झाली आहे. सहाही झोन मध्ये मतदान केंद्रावर तयारी केली जात आहे. महापालिकेकडून मतदान जागृती अभियान अतिशय प्रभावीपणे राबविण्यात आले. आता मतदानाला दोन दिवस शिल्लक आहेत. गुरूवारी अकोला महापालिका क्षेत्रातील मतदारांनी निर्भयपणे मतदान करावे असे आवाहन करण्यात आले आहे.

# विशेष पोलीस महानिरीक्षक अमरावती यांनी केले अकोला जिल्हा पोलीस दलाचे वार्षिक निरीक्षण !

प्रतिनिधी १३ जानेवारी

**अकोला :** विशेष पोलीस महानिरीक्षक अमरावती परीक्षेत्र अमरावती मा. श्री. रामनाथ पोकळे यांनी सोमवारी अकोला जिल्हा पोलीस दलाचे वार्षिक निरीक्षण केले. यावेळी पोलीस मुख्यालयात आयोजित भव्य परेडद्वारे त्यांना मानवंदना देण्यात आली. शिस्तबद्ध परेड व पोलीस दलाच्या सज्जतेने निरीक्षणाला विशेष ठसा उमटवला.

वार्षिक निरीक्षणानंतर जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयात आढावा बैठक घेण्यात आली. या बैठकीत जिल्ह्यातील वर्षभरात दाखल झालेल्या गुन्ह्यांचा सखोल आढावा घेण्यात आला. प्रत्येक गंभीर गुन्ह्यातील तपासाची प्रगती, दोषारोपपत्र दाखल करण्याची स्थिती, न्यायालयीन कारवाई आणि दोषसिद्धीचे प्रमाण यावर आयजीपीओ पोकळे यांनी बारकाईने चर्चा केली.



यावेळी त्यांनी स्पष्ट निर्देश देत सांगितले की, गंभीर गुन्ह्यांतील आरोपींना कठोर शिक्षा व्हावी, यासाठी तपास शास्त्रीय, कायदेशीर व वेळेत पूर्ण झाला पाहिजे. पुरावे संकलन, तांत्रिक तपास, साक्षीदारांचे संरक्षण आणि अभियोजनाशी समन्वय या बाबींवर विशेष लक्ष देण्याचे आदेश त्यांनी दिले. तसेच प्रतिबंधक कारवाया वाढवून गुन्हेगारीवर प्रभावी अंकुश कसा ठेवता येईल, यावर मार्गदर्शन केले. अकोला पोलिसांचा गुन्हेगारी वर नियंत्रण करणारा प्रोजेक्ट त्रिनेत्र बाबत जाणून घेतले तसेच ेंग टेकनॉलॉजी वापर गुन्हेगारी नियंत्रणा साठी करता येतो एक दिशादर्शक योजना अकोला पोलीस राबवत असल्या बाबत समाधान व्यक्त केले. आगामी महानगरपालिका व जिल्हा परिषद निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी सतर्कता वाढवण्याच्या सूचना देण्यात आल्या. संवेदनशील भागांमध्ये विशेष बंदोबस्त, सोशल मीडियावर लक्ष, दंगल प्रतिबंधक उपाययोजना आणि निवडणूक काळातील तक्रारींचे तत्काळ निराकरण याबाबत स्पष्ट निर्देश आयजीपीओंनी दिले. या बैठकीला मा. मुख्यमंत्री १५० दिवसांच्या कृती आराखडा अंतर्गत जिल्हा पोलीस अधीक्षक श्री. अचिंत चांडक, अपर पोलीस अधीक्षक श्री. चंद्रकांत रेड्डी, शहर पोलीस उपअधीक्षक सुदर्शन पाटील, स्थानिक गुन्हे शाखेचे प्रमुख शंकर शेळके यांच्यासह जिल्ह्यातील सर्व पोलीस अधिकारी उपस्थित होते. एकूणच, या वार्षिक निरीक्षणातून पोलीस दलाच्या कार्यक्षमतेचा आढावा घेत गुन्हे नियंत्रण, तपासाची गुणवत्ता आणि कायदा-सुव्यवस्थेच्या मजबुतीवर भर देण्यात आला.




हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी भास्कर प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट क्र. टी- ५१ एम. आय. डी. सी. फेज - ४, अकोला ग्रोथ सेंटर, येवता रोड, शिवणी, अकोला - ४४४००२ येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले. ▪ **मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख** ▪ **संपर्क –** 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642, RRC Helpline No. 8484842135

CMYK CMYK